गुरुवार, १८ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२५०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●THURSDAY 18 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-250 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

## चर्चेतली बातमी

## क्रिकेटर सौरव गांगुलीला झेड श्रेणीची सुरक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**कोलकाता :** पश्चिम बंगाल सरकारने भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुलीच्या सुरक्षेत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ममता बॅनर्जी सरकार आता गांगुलीला झेड श्रेणीची सुरक्षा देणार आहे. नवीन सुरक्षा व्यवस्थेनुसार बीसीसीआयच्या माजी अध्यक्षांवर आठ ते दहा पोलिसांचा पहारा असेल. 'वाय' श्रेणी सुरक्षा कवचाखाली गांगुलीला तीन पोलिसांचे रक्षण होते. बेहाला येथील त्याच्या निवासस्थानी तितक्याच संख्येने सुरक्षा कर्मचाऱ्यांनी पहारा यापुढे देतील. मात्र, क्रिकेटच्या दादाला एवढी सुरक्षा का देण्यात आली यामागील कारण बंगाल सरकारकडून सांगण्यात आले आहे. भारताचा माजी क्रिकेटपटू सौरव गांगुलीला पश्चिम बंगाल सरकारने झेड श्रेणीची सुरक्षा दिली आहे. गांगुलीला आधीच 'वाय' श्रेणीची सुरक्षा होती. मात्र आता त्यात सुधारणा करण्यात आली आहे. त्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. गांगुली सध्या आयपीएलमधील दिल्ली कॅपिटल्स संघाचे क्रिकेट संचालकपद सांभाळत आहे. माजी कर्णधार गांगुलीने राज्य किंवा केंद्र सरकारकडे कोणतीही विनंती नव्हती, परंतु पश्चिम बंगाल सरकारच्या प्रशासकीय कार्यालयाने ती मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयच्या माजी अध्यक्षांना यापूर्वी 'वाय' श्रेणीची सुरक्षा होती. त्याची मुदत संपल्यानंतर मंगळवारी (१६ मे) सरकारने गांगुलीची सुरक्षा वाढवण्याचा निर्णय घेतला.

# कोण होणार कर्नाटकचा मुख्यमंत्री ?

## अफवांवर विश्वास ठेवू नका; पुढच्या ४८ तासांमध्ये यावर निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरू : कर्नाटकच्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसने एकहाती यश मिळवले आहे. मात्र मुख्यमंत्री कोण होणार याचा पेच अद्यापही कायम आहे. मुख्यमंत्रीपदाचे दोन मोठे दावेदार आहेत. पहिले आहेत सिद्धरामय्या आणि दुसरे आहेत डी. के. शिवकुमार. या दोघांनीही आज राहुल गांधींची भेट घेतली आहे. या दोघांच्या रेसमध्ये मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर कोण बसणार हे अद्याप समजू शकलेले नाही. अशात विविध चर्चांना उधाण आले आहे. सिद्धरामय्याच पुढचे मुख्यमंत्री असतील अशाही बातम्या सूत्रांच्या हवाल्याने दिल्या जात आहेत.**





मात्र कॉंग्रेस प्रभारी रणदीप सुरजेवाला यांची प्रतिक्रिया चर्चेत आहे. याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. तुम्ही कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. पुढच्या ४८ तासांमध्ये यावर निर्णय घेतला जाईल. मुख्यमंत्रीपदाची माळ कुणाच्या गळ्यात घालायची याबाबत आमची चर्चा सुरु आहे. या आशयाचे वक्तव्य रणदीप सुरजेवालांनी केले आहे. तसेच भाजपावरही त्यांनी टीका केली आहे. ते म्हणाले, भाजपाचा या निवडणुकीत पराभव झाला आहे. आता ते वैफल्यग्रस्त अवस्थेतून विविध खोट्या बातम्या पसरवू लागले आहेत. त्याकडे मुळीच लक्ष देऊ नका. कर्नाटकच्या सत्तास्थापनेसंदर्भात लवकरच निर्णय होईल. त्यानंतर एकदा सरकार स्थापन झाले की पुढच्या ४८ ते ७२ तासांमध्ये कॅबिनेटची बैठक होईल. असेही सुरजेवालांनी स्पष्ट केले.

**डी. के. शिवकुमार यांच्यावर अनेक गंभीर आरोप**

डी. के. शिवकुमार हे मागील कित्येक वर्षांपासून कॉंग्रेस पक्षाचे काम करतात. त्यांनी या निवडणुकीत पक्षाचे नेतृत्व करीत एकहाती सत्ता मिळवून दिली. हायकमांडलादेखील असेच वाटते. त्यांनी केलेल्या परिश्रमाचे फळ म्हणून त्यांना मुख्यमंत्री केले जावे, असे हायकमांडला वाटते. मात्र डी. के. शिवकुमार यांच्यावर आर्थिक गैरव्यवहार, करचुकवेगिरी, बेहिशेबी मालमत्ता बाळगणे, अशा प्रकारचे आरोप आहेत. याच आरोपाप्रकरणी त्यांच्याविरोधात गुन्हेदेखील दाखल आहेत. याच कारणामुळे त्यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपवणे योग्य राहील का, असा प्रश्न कॉंग्रेस पक्षश्रेष्ठींना पडला आहे.

**सिद्धरामय्या आणि डीके राहुल गांधींच्या भेटीला**

कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंची भेट घेतल्यानंतर आज डी. के. शिवकुमार आणि सिद्धरामय्या या दोघांनीही राहुल गांधींची भेट घेतली. या दोघांनीही राहुल गांधींची वेगवेगळी भेट घेतली. सोनिया गांधी यांच्या १० जनपथ या ठिकाणी असलेल्या निवासस्थानी ही भेट झाली. दोन्ही नेत्यांची राहुल गांधींसह सकारात्मक चर्चा झाल्याचे समजते आहे. सिद्धरामय्यांनी सुमारे ३० मिनिटे राहुल गांधींसह चर्चा केली. तर डी. के. शिवकुमार हे तासभर राहुल गांधी यांच्याशी चर्चा करत होते. या भेटीनंतर शिवकुमार हे पुन्हा एकदा मल्लिकार्जुन खरगेंना भेटायला गेले होते.

# मुकेश अंबानींच्या घरासमोर स्फोटके ठेवण्याची कल्पना फडणवीसांचीच

## नाना पटोले यांचा गंभीर आरोप; परमबीर सिंह हे देवेंद्र फडणवीस यांच्या हातचे बाहुले

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** मुकेश अंबानी यांच्या अँटेलिया या निवासस्थानासमोर स्फोटकांनी भरलेली गाडी उभी करणे, अनिल देशमुखांवर १०० कोटींच्या वसुलीचे आरोप करणे हे सगळे महाविकास आघाडीला बदनाम करण्यासाठी ठरवून केले होते. त्यामागे देवेंद्र फडणवीस होते मी ते विधानसभेतही म्हटले होते. आता ते स्पष्ट झाले आहे असे म्हणत नाना पटोलेंनी गंभीर आरोप केला आहे. याबाबत देवेंद्र फडणवीस काही उत्तर देणार का हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

परमबीर सिंह हे देवेंद्र फडणवीस यांच्या हातचे बाहुले होते हे देखील स्पष्ट झाले आहे. परमबीर सिंह यांनी केलेल्या मदतीची परतफेड म्हणून शिंदे-फडणवीस सरकारने कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता निलंबन रद्द करुन पुन्हा सेवेत घेण्यासाठी मदत केली आहे. असाही आरोप नाना पटोलेंनी केला आहे.

कॅटच्या ऑर्डरमध्ये हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की सन्माननीय मुंबई उच्च न्यायालयाने सीबीआयला स्पष्ट आदेश दिले होते की, आपण चौकशी करून आरोपपत्र दाखल करा तसेच परमबीर सिंह यांची विभागीय चौकशी करा. पण शिंदे फडणवीस सरकारने ते केले नाही. परमबीर सिंह यांना निलंबित केले होते पण त्यांच्या निलंबनाचा दर तीन महिन्याला आढावा घेऊन निलंबनाला मुदतवाढ देणे आवश्यक होते. मात्र शिंदे फडणवीस सरकारने ना परमबीर सिंह यांची विभागीय चौकशी केली ना त्यांच्या निलंबनाला मुदतवाढ दिली. त्यामुळे कॅट न्यायाधिकरणासमोर झालेल्या सुनावणीत राज्य सरकारच्या भूमिकेमुळे परमबीर सिंह यांना दिलासा मिळाला. मुकेश अंबानी यांच्या मुंबईतील घराजवळ (अँटेलिया) २५ फेब्रुवारी २०२१ च्या संध्याकाळी साडे सहा-सात वाजेच्या सुमारास एक संशयित कार आढळून आली होती. या कारबाबत माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन कारची तपासणी केली होती. त्यावेळी कारमध्ये काही जिलेटीनच्या कांड्या सापडल्या होत्या. जेव्हा याबाबतची माहिती माध्यमांसमोर आली तेव्हा संपूर्ण देशात अक्षरशः खळबळ उडाली. एवढेच नव्हे तर त्याच दिवशी पोलिसांच्या हाती एक सीसीटीव्ही फुटेज देखील लागले. ज्यामध्ये दिसून आलं की, एका व्यक्तीने स्कॉर्पिओ कार अँटेलिया बाहेर पार्क केली होती आणि नंतर तो मागे उभ्या असलेल्या इनोव्हा कारमधून निघून गेला होता. या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता गृहमंत्री अनिल देशमुख यांनी हे प्रकरण मुंबई क्राईम ब्रांचकडे चौकशीसाठी सोपवले होते. तेव्हा या प्रकरणाचे तपास अधिकारी हे सचिन वाझे हे होते.

# जिल्ह्याचा उल्लेख संभाजीनगर नाही, तर औरंगाबाद करा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** औरंगाबादचे नामकरण संभाजीनगर करण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिल्यानंतर सर्वत्र संभाजीनगर उल्लेख होत आहे. मात्र, हे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर या याचिकांवर अंतिम निर्णय होईपर्यंत मुंबई उच्च न्यायालयाने जिल्ह्याचा उल्लेख आधीप्रमाणे औरंगाबादच करण्याचे निर्देश दिले. यानंतर औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासनाला तसे आदेशही दिले. मात्र, जिल्ह्याचा उल्लेख संभाजीनगरच होत असल्याने आता इनामदार सय्यद मोइनुद्दीन व सय्यद अंजारोद्दीन कादरी यांनी सामान्य प्रशासनाच्या मुख्य सचिवांकडे केली आहे. तसेच हे न्यायालयाच्या अवमाननेचे प्रकरण असल्याचे म्हटले आहे. औरंगाबादचे जिल्हाधिकाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या २० एप्रिल २०२३ च्या आदेशाचा संदर्भ देऊन आदेश दिले, औरंगाबाद जिल्ह्याचे नाव बदलून छत्रपती संभाजी नगर करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल आहे. नामांतराबाबत प्राप्त झालेल्या आक्षेपांची सुनावणी सुरू असताना महसूल व इतर विभागाशी संबधित कार्यालये जिल्ह्याचे नाव बदलत असल्याची बाब याचिकाकर्त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यावर उच्च न्यायालयाने पुढील आदेशापर्यंत महसूल व इतर विभागाशी संबंधीत कोणत्याही कार्यालयांनी औरंगाबाद नावात बदल न करणेबाबत निर्देश दिले आहेत. यासोबत उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत संलग्न करण्यात आली आहे. तरी आदेशातील सुचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे, असेही आदेशात म्हटले. इनामदार सय्यद मोइनुद्दीन व सय्यद अंजारोद्दीन कादरी यांनी सामान्य प्रशासनाच्या मुख्य सचिवांना केलेल्या तक्रारीत म्हटले, औरंगाबाद नामकरणाबाबत आम्ही मुंबई उच्च न्यायालयाकडे याचिका दाखल केली आहे. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या प्रकरणी २४ एप्रिल २०२३ च्या सुनावणीत उच्च न्यायालयाने कडक निर्देश देत स्पष्ट केले की, जोपर्यंत हे प्रकरण न्यायालयीन प्रक्रियेत प्रलंबित आहे तोपर्यंत जिल्हा/तालुका/गाव/विभाग/उपविभागाचे नामांतर करू नये. महसूल/पोलीस/टपाल व इतर विभागातील कोणत्याही शासकीय पत्रात औरंगाबाद ऐवजी दुसऱ्या नावाचा वापर करू नये, असे कडक निर्देश दिले आहेत. यावर शासनाच्यावतीने महाधिवक्ता डॉ. विरेंद्र सराफ यांनी हमी दिली की, न्यायालयाच्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन केले जाईल. मात्र, यावर सबंधित एकही विभागाकडून कुठेही अंमलबजावणी होताना दिसत नाही. ही बाब न्यायालयाची अवमानना आहे, असे तक्रारदारांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील अधिकृत वृत्तपत्र, वृत्तवाहिन्यांवर सर्रासपणे औरंगाबाद जिल्ह्याचे नाव बदलुन छापले आणि बोलले जात आहे. औरंगाबाद नामांतरानंतर टीआरपी वाढवण्यासाठी माध्यमं औरंगाबादचं नाव संभाजीनगर वापरत आहेत. यामुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. औरंगाबाद शहरात दंगलीसारखे वातावरण निर्माण झाले होते. पोलीस प्रशासनाच्या योग्य व धडक कारवायांमुळे सध्या शहर शांत दिसत आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असून प्रसारमाध्यमांतून सर्वत्र जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. म्हणून सर्व प्रसारमाध्यमांना कुठे तरी आळा बसवण्याची गरज आहे.

उच्च न्यायालयाकडून देण्यात आलेल्या निर्देशाची तत्काळ अंमलबजावणी करण्यात यावी आणि प्रसारमाध्यमांना औरंगाबाद जिल्हा/तालुका/गाव/विभाग/उपविभाग ऐवजी दुसरे नाव लिहिणे टाळावे. अन्यथा आम्हाला पुढील सुनावणीत संबंधित कार्यालयाकडून न्यायालयाच्या निर्देशांची अवमानना होत असल्याचे निदर्शनास आणून द्यावे लागेल. या व्यतिरिक्त प्रसारमाध्यमांकडून होणाऱ्या न्यायालयाची अवमाननेबाबत कायदेशीर याचिका दाखल केले जाईल याची नोंद घ्यावी, असेही त्यांनी नमूद केले.



## उगवतीचे रंग






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# कोण कुणाकडे राहतंय ?



अपेक्षा पूर्ण होत नसल्याने होणारे अपेक्षाभंगाचे दुःख फार मोठे असते. सुख सुख म्हणून आयुष्यभर ज्या गोष्टींचा पाठलाग केला त्या सुख देण्यास असमर्थ ठरतात. अशा वेळी माणसाचे मन ईश्वराकडे धाव घेते. आपला जन्म या मातीतला. पण या मातीला आभाळाची ओढ लागते. मोहमायेच्या, नात्यांच्या बेड्या माणसाला या मातीत जखडत असतात. मन मात्र पंख लावून आभाळाकडे उडतअसते. कवी म. म. देशपांडे यांची एक सुंदर कविता आहे. ' अंतरिक्ष फिरलो पण...' या नावाची. त्यात कवी म्हणतो. अंतरिक्ष फिरलो पण गेली न उदासी गेली न उदासी. आज माणसाने भौतिक प्रगती खूप केली आहे. त्या प्रगतीच्या जोरावर तो अंतरिक्षात फिरून आला पण त्याच्या मनातली उदासीनता, असमाधानाची भावना काही गेली नाही. पुढे कवी म्हणतो लागले न हाताला काही अविनाशी काही अविनाशी त्याच्या हाताला अविनाशी असे काहीच लागले नाही. सगळ्या गोष्टी विनाशीच आहेत. पुढील दोन कडवी फार सुंदर आहेत. क्षितिज तुझ्या चरणांचे दिसते रे दूर दिसते रे दूर घेऊन मी चालू कसा भरलेला ऊर भरलेला ऊर. परमेश्वराच्या चरणांना कवी क्षितिज असे म्हणतो. क्षितिज जवळ आल्यासारखे वाटले तरी प्रत्यक्षात ते लांबच असते. अनेक वासनाविकारानी, जीवनातील ताणतणावांनी कवीचे हृदय व्यथित झाले आहे. असा हा ' भरलेला ऊर ' घेऊन त्याच्यापर्यंत जाता येत नाही. कवितेची शेवटची दोन कडवी पहा. कवी म्हणतो जरि वाटे जड कळले तळ कळला नाही तळ कळला नाही. जड म्हणते ' माझा तू ' क्षितिज म्हणे ' नाही ' क्षितिज म्हणे ' नाही. ' या ओळीत कवीला सांगायचे आहे की भौतिक प्रगती आपण केली की आपल्याला अगदी स्वर्ग जिंकल्याचा भास होतो. आपल्याला सगळे कळले असे वाटते. पण ' तळ ' म्हणजेच मूळ गाभा, शक्ती किंवा चैतन्य आपल्याला कुठे कळलेले असते ? आपण त्यापासून अनभिज्ञच असतो. जड आणि चेतन, पार्थिव आणि अपार्थिव अशा एका विचित्र कोंडीत तो सापडला आहे. जडाशी जखडला आहे.



# आनंदी पहाट

## सुख हे जीवनाचे सार नाही

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रेमाची परिभाषा समजण्यासाठी अगोदर त्या प्रेमाची अनुभूती घ्यावी लागत असते. प्रेम दिल्याशिवाय ते मिळतेच असे नाही. अनेकदा ते मिळत नाही म्हणून दिलेही जात नाही. प्रेमामध्ये त्याग महत्वाचा असतो, तोच अनेकदा नको असतो. प्रेम हे काही केवळ एक स्त्री-पुरुष ह्यांच्या परस्परांतील असते असे नाही. आपले अंतर्मन हे खरे तर प्रेमाचे प्रतिबिंब असावे, त्या प्रतिबिंबित छबीदार रूपांत दडलेल्या प्रेमाचा साक्षात्कार व्हावा लागतो. प्रेमाची परिभाषा आर्थिक प्रमेयाशी जोडली जात असल्याचे खेदजनक चित्र अनेक ठिकाणी आपल्याला दिसत असते. प्रेमामध्ये शब्दांपेक्षा भाव-भावनाच अधिक महत्वाच्या असतात. निस्वार्थी प्रेमाची जाणीव असणे जरुरीचे असते.

जीवनाचे खरे सार आपण दुसऱ्यांना, इतरांना देत असलेल्या आणि आपल्याला मिळत असलेल्या प्रेमांत सामावलेले असते. प्रेमासाठी तन अथवा धन नाही, तर मन महत्वाचे असते, ह्याची जाणीव सतत ठेवणे जरुरीचे असते. प्रेमाच्या प्राप्तीचीच अनेकदा उणिव असल्याचे दिसते, त्यामुळेच समूहामध्ये, घोळक्यात, गर्दीत देखील एखादी व्यक्ती स्वतःला एकटे समजत असते. त्याउलट प्रेमाचा वर्षाव होत असलेल्या व्यक्तीला एकटे असताना देखील मानसिक एकलेपण जाणवत नाही. तेच खरे जीवनातले सार आहे. सुखाचा संबंध अनेकदा शरीराशी जोडला जात असतो. सुखद अनुभवांची आश्वासकता ही मनाला देखील

जरुरीची असतेच. परंतू शारीरिक पातळीवर सुखी होण्याची केविलवाणी धडपड आपण दिवसरात्र करत असतो. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आपण सुख मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतो. आपल्याला अपेक्षित सुख मिळेपर्यंत आपली धडपड सुरुच असते. सुखामध्ये देखील आपल्यापैकी अनेकजण शरीरसुख हेच सर्वोच्च सुख असल्याच्या भ्रमांत आणि संभ्रमांत असतात. त्याही सुखांत शरीरापेक्षा मनाचा सहभागच अधिक असतो ह्याची त्यांना जाणीव होत नाही.



आधुनिक केसरी

**शुद्ध आचरण | संतांसनगे ||**
गर्दभाच्या संगे | गंधर्व बिघडे ||
संगतीचे धडे | जाण मना ||१||
तामसी मनाचा | घडु नये संग ||
साधनेचा भंग | घात करी ||२||
सज्जन संगती | चंदन शितळ||
भाव परिमळ | सुगंधित ||३||
आपुल्या हीताचे | करावे जतन ||
ठेऊनिया भान | विवेकाचे ||४||
आता ऐक मना | मुक्तीचे साधन ||
शुद्ध आचरण | संतांसनगे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

श्रीगणेशाय नमः | श्रीदुर्गादेव्यै नमः | श्रीमहाकालीमहालक्ष्मीमहासरस्वती भ्यो नमः | श्रीगुरवे नमः | आरक्तवसनां दिव्यां नमामि भक्तवत्सलाम्| तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || २ || आरक्त वस्त्र परिधान करणाऱ्या भक्तवत्सला अशा तुला मी नमस्कार करतो. मी दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**अशुचि शुची सुख दुखन में, भ्रम अनित्य नित्य भासु । आत्म अनात्महिं में भसै, कहत अविद्या तासु ।।२४५।। पृथक् बुद्धि वर्तमान को, आतम भिन्न न जान । वृत्ति अस्मिता मानिये, ग्रन्थि भ्रान्ति दुख खान ।।२४६।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय)**
**०६/०६/२४६**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
अपवित्रला पवित्र, दुःखाला सुख, क्षणभंगुरला शाश्वत, जड ला चेतन समजणे ही अविद्या आहे. आत्मज्ञानाहून पृथक् अन्य जड अनित्य पदार्थांप्रती ओढ असणे आणि जड हे चेतनाहून भिन्न आहे असे ज्या क्षणी ज्ञान होत नाही ( म्हणजेच जड, अचेतन पदार्थ हे चेतन पदार्थां पासून वेगळे आहेत, असे ज्याक्षणी ज्ञान होत नाही ) ती अज्ञानाची ग्रंथी ( गाठ ) , अस्मिता आहे आणि हा भ्रम, दुःखाची खाण आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# काव्य-चरितावली



पुष्प २७वे

आधुनिक केसरी



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

**काशीनगरी मुक्कामी दिवसात**
**अनेक भक्तांवरती कृपा केली**
**कृपाप्रसादे मंडळी आनंदली**
**श्रीमहाराजांची प्रसिद्धी झाली ।।**
**सोडली काशी, प्रयागक्षेत्री आले**
**आध्यत्मिक महाराजांना पाहुनी**
**बैरागी लोक संतोषले, त्यांनी**
**श्रीमहाराजांना महंत मानले ।।**
**श्रीमहाराजांनी कृपा केली ज्यावरी**
**जमीनदार घेउनी गेला घरी**
**सांगा-काय करू मी तुमची सेवा ?**
**हट्ट तो लगे करू वरचेवरी ।।**
**हरिहाट करा" आज्ञा त्यास केली**
**सिद्धता केली जमीनदाराने ही**
**अन्नछत्र, दानधर्म , कर्म केले**
**कार्य असे हे करवून घेतले ।।**
**श्रीगुरुकृपा महिमा असा थोर**
**म्हणे-अरुणदास,ना जीवा घोर ।।**

# संत हे आपला संबंध भगवंताशी जोडतात

आधुनिक केसरी

आपले हृदय विषयाने इतके भरले आहे, की तिथे भगवंताच्या प्रेमाला जागाच राहिली नाही. बरे, भगवंताचे प्रेम मुद्दाम तिथे घातले, तर ते आत न राहता बाहेर पडते आणि वाऱ्यावर उडून जाते. सामानाने गच्च भरलेली जशी एखादी खोली असते, तसे आपले हृदय आहे. या हृदयाचा संबंध भगवंताशी जोडण्यासाठी, आपल्या हृदयातले सामान, म्हणजे विषय, खाली करून त्याच्या जागी भगवंताचे प्रेम भरणे जरूर आहे. साधारणपणे आपला अनुभव असा आहे की, एखादी वस्तू आपल्याला पुष्कळ आणि पुन्हापुन्हा मिळाली तरी तिचा वीट येतो; म्हणून जी वस्तू आपल्याला कितीही मिळाली तरी तिचा वीट येणार नाही अशी वस्तू आपण मिळवावी. अशी अवीट असणारी वस्तू एकच आहे; ती म्हणजे भगवंत होय. राजाने आपल्या नावाचा शिक्का केला, आणि जो अती प्रामाणिक होता त्याच्याजवळ दिला; त्याप्रमाणे भगवंताने आपले नाम संतांना दिले. त्यामुळे, संत जे करतील त्याला मान्यता देणे भगवंताला जरूरच आहे. आपण आणि संत यांच्यामध्ये



मनुष्य या दृष्टीने फरक नाही; पण फरक आहे तो हा की, संत हा जसे बोलतो तसे वागतो, तर आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट. आपल्या स्वार्थाच्या आड कोणी आले की आपण वाईट बोलतो. ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याच वस्तूवर दुसऱ्याने प्रेम केले तर आपण त्याला नावे ठेवतो. आपण नुसती नीतीची तत्त्वे जेव्हा सांगतो तेव्हा अगदी चांगले बोलतो; पण वागताना मात्र उलट वागतो. यासाठी आपण अशी कृती करू या, की आपल्याला नंतर तसे बोलता येईल. गाडीत बसायला मिळावे म्हणून काही कोणी गाडीत बसत नाही तर आपल्या स्टेशनाला जाण्यासाठीच मनुष्य गाडीचा आधार घेतो. तसा, मोठमोठ्या संतांनी प्रपंच केला खरा, परंतु तो सुखासाठी केला नाही. आपल्या वृत्तीपासून न ढळता इतरांना तारण्याचे काम संतांनी केले. बुडणाऱ्या माणसाला जसा दोरीचा आधार द्यावा, त्याप्रमाणे संतांनी आपल्याला परमात्म्याचा आधार दिला. चंदनाच्या झाडाजवळच्या झाडांना जसा चंदनाचा वास लागतो, त्याप्रमाणे संताजवळ राहतो तोही संतच बनतो. काही कष्ट न करता परमार्थ साधणे हेच सत्संगतीचे महत्त्व आहे. **आजचे बोधवचन आहे - आपण प्रपंचात इतके खोल जातो की संतांची हाकच ऐकू येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे.**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, १८ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# गोदावरी नदीत रसायन टाकल्याप्रकरणी पाटबंधारे सुस्त अधिकारी आधुनिक केसरीच्या बातमीने जागे

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** गोदावरी नदीवरील खेडलेझुंगे साठवण बंधाऱ्यात मार्च व मे महिन्यात दोनदा रसायन सोडण्यात आले. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असला तरी पाटबंधारे विभाग सुस्त असून ते अपराध्यास वाचवत असल्याची नागरिकांची भावना निर्माण झाली आहे. मात्र आधुनिक केसरी मध्ये याबाबत वृत्त झळकताच यंत्रणा खडबडून जागी झाली असून पाणी तपासणी साठी पाठविण्यात आले असून याबाबत लासलगाव पोलीस स्टेशनला कळविण्यात आल्याचे पाटबंधारे खात्याकडून सांगण्यात आले.

दि.१९ मार्च रोजी या साठवण बंधाऱ्यात रसायन टाकण्यात आले होते. त्यामुळे पाणी दूषित होऊन जलचर प्राणी मरून वर आले होते. पाण्याचा उग्र वास सुटल्याने नागरिकांना भर उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागले असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या घटनेची माहिती तहसिलदार, प्रांताधिकारी, जिल्हाधिकारी यांना देण्यात आली. पाटबंधारे विभागाशी संपर्क केला असता कुणाचे मोबाईल बंद तर ज्यांच्याशी संपर्क झाला त्यांनी आम्ही संपात असल्याचे कळविले. मा.जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार यांनी आदेश केल्यानंतर सोमठाणे येथील कालवे निरीक्षक पी.एस.सुरासे यांनी दि.२० मार्च रोजी समक्ष पाहणी करून पाण्याचे नमुने घेतले. मात्र सिंचन शाखा, सोमठाणे, सागर शिंदे, कार्यकारी अभियंता, महेश गायकवाड -सहाय्यक अभियंता श्रेणी १, ओंकार भंडारी, शाखाधिकारी पाटबंधारे विभागातील या अधिकाऱ्यांशी नागरिकांनी संपर्क साधला मात्र कुणीही वरिष्ठ अधिकारी इकडे फिरकले नाही. लासलगांव पोलीस ठाण्याशी संपर्क केला असता लासलगांव पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक लहानू धोक्रट, पो.ना.संदिप शिंदे तातडीने हजर झाले. दि.२० मार्च रोजी पाण्याचा नमुना घेवुन आज दोन महिने उलटले परंतु अद्यापही पाणी तपासणी अहवाल प्राप्त झाला नाही. सदर गंभीर प्रकरणाची पोलीस ठाण्यात साधी तक्रार देखील पाटबंधारे विभागाने दिलेली नाही, त्यामुळे अधिकारी वर्ग सदर रसायन टाकणाऱ्या अज्ञातास पाठीशी घालत असावेत किंवा सदर कंपनीशी आर्थिकपुर्ण असे संबंध जोपासत असावेत असा नागरिकांना संशय निर्माण झाला आहे. परिसरातील गावकऱ्यांचे व नदी बचाव समितीच्या म्हणण्यानुसार हे पाप वाळु माफीयांचे असावे. ते पाणी सोडून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यामुळे रसायनयुक्त पाण्याचे निमित्त करून, पाटबंधारे विभागातील अधिकारी वर्गाला हाताशी धरुन पाणी सोडुन दिले की वाळु उपसा करणे सोयीचे होणार आहे. मार्च मधील प्रकरणाची अद्याप चौकशी झाली नसतांनाच दि.१५ मे रोजी पुन्हा रसायन सोडण्यात आले आहे. या प्रकरणाचा आधुनिक केसरी पाठपुरावा करीत असून याबाबत काल दि. १६ मे रोजी याबाबत वृत्त प्रकाशित होताच गोदावरी नदीच्या पात्रात केमिकल युक्त रासायनिक द्रव्ये टाकलेल्या हिरव्या रंगाच्या पाण्याचे नमुने तपासणी साठी घेण्यात आले आहे. नाशिकच्या महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण शाखेच्या पथकाने गोदावरी नदीच्या पात्रातील दुर्गंधी युक्त पाणी नमुने गोळा करून तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले आहे.

> सोमठाणे पाटबंधारे विभागाच्या शाखेने खेडलेझुंगेच्या गोदावरी नदीच्या पात्रात केमिकल युक्त रासायनिक द्रव्ये टाकले विषयी व आधी घेतला पाणी नमुने तपासणी रिपोर्ट लासलगाव पोलिस ठाण्याला रितसर लेखी स्वरूपात कळविले आहे .
> **ओमकार भंडारी, शाखा अभियंता सोमठाणे, गोदावरी सिंचन विभाग नाशिक**




ह्या प्रथकाने पहिला जो रासायनिक द्रव्ये फेकलेले होते. त्याची तपासणी अहवाल साधारण आला होता. मात्र आता गोदावरी नदी पात्रातील रासायनिक द्रव्ये मिळलेली स्थिती गंभीर दिसत आहे. कारण नदीपात्रात हिरव्या रंगाचा थर अन् छटा गडद होत आहे. नाशिक पाटबंधारे विभागाच्या सोमठाणे शाखेने ह्या प्रकरणाचे गांभीर्य ओखळले आहे. त्यांच्या प्रशासनाने लासलगाव पोलिस ठाण्याला लेखी स्वरूपात माहिती कळविली आहे.

यापुर्वी गोदावरी नदी पात्रात केमिकल युक्त रासायनिक द्रव्ये गोण्या आढळून आल्या होत्या. त्यावेळी गोदावरी नदी पात्रातील पाण्याचा रंग बदलेला नव्हता असे स्थानिक सांगतात. त्यावेळी पाणी नमुने गोळा करून तपासले. पहिल्या घटनेचा रिपोर्ट येण्यापूर्वी पुन्हा अधिक प्रमाणात केमिकल युक्त रासायनिक द्रव्ये टाकण्यात आले. त्यांचा परिसरात खेडलेझुंगे पासून ते कानळदच्या साठवण बंधारा पर्यंत दोन किलोमीटर परिघात दिसत आहे.

## 'एक तास राष्ट्रवादीसाठी' या कार्यक्रमावर अधिक भर द्यायचा निर्णय : जयंत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महिन्याच्या पहिल्या शनिवारी प्रत्येक गावात



'एक तास राष्ट्रवादीसाठी' हा कार्यक्रम घेण्यात येतो. यामध्ये गावप्रश्नापासून ते देशस्तरावरील प्रश्नांचा उहापोह होतो. त्यामुळे आजच्या कोअर कमिटीच्या बैठकीत 'एक तास राष्ट्रवादीसाठी' या कार्यक्रमावर अधिक भर द्यायचा असा निर्णय करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

बुथ कमिट्यांचा कार्यक्रम अधिक भक्कम व सक्षम करण्यासाठी विभागीय स्तरावर नेत्यांच्या कमिट्या करुन त्या विभागस्तरावर पूर्ण कराव्यात अशी चर्चा झाली. शिबिरे आयोजित करून त्या शिबिराला आदरणीय शरद पवारसाहेब स्वतः उपस्थित राहणार आहेत. बुथ कमिट्यांची विभागस्तरावर काही नेत्यांकडे जबाबदारी देण्यात आली आहे अशी माहितीही जयंत पाटील यांनी यावेळी दिली.

राज्यात दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याबाबत बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली. त्र्यंबकेश्वरमध्ये सूरू असलेल्या प्रथेचा गैरसमज करण्यात आला आहे. वर्षानुवर्ष तिथे परंपरा चालू आहे. मात्र यासाठी तात्काळ एसआयटी स्थापन करण्यात आली याबाबत आश्चर्य जयंत पाटील यांनी व्यक्त केली.  लोकसभा आणि विधानसभेचा कोणताही फॉर्म्युला ठरला नाहीं. कोणतेही सूत्र ठरलेले नाही. त्यामुळे बाहेर सांगण्याचा विषय येत नाही. कोणत्याही लोकसभा मतदारसंघाबाबत आमची चर्चा झालेली नाही. महाविकास आघाडीची बैठक झाली त्याबाबतची माहिती आम्ही अगोदरच दिली आहे असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. आमच्या तिन्ही पक्षाच्या वेगवेगळ्या नेत्यांना प्रश्न चॅनल्सकडून विचारले जातात आणि त्यामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता आहे त्यामुळे अशा सर्व प्रश्नांना उत्तर टाळणं हे महत्वाचे आहे असेदेखील बैठकीत ठरवण्यात आले आहे.

६ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३४९ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा म्हणजे एक भारतवर्षातील स्वाभिमानी राज्य निर्माण करण्याचा प्रसंग होता आणि म्हणून महाराष्ट्रातील मराठी माणूस छत्रपती शिवाजी महाराजांना आराध्य दैवत मानतो. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने संपूर्ण राज्यात राज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात येणार आहे अशी माहितीही जयंत पाटील यांनी दिली.

१० जून २०२३ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसला २४ वर्षे पूर्ण होऊन राष्ट्रवादी काँग्रेस २५ व्या वर्षात पदार्पण करत आहे. त्यामुळे अहमदनगर येथे जाहीर सभेचे आयोजन करुन हा वर्धापन दिन साजरा केला जाणार असल्याचे जयंत पाटील यांनी जाहीर केले.

## 'लेडी सिंघम'चा संशयास्पद मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** आसामध्ये 'लेडी सिंघम' अशी



ख्याती असणाऱ्या एका महिला उपनिरीक्षकाचा अपघातात मृत्यू झाला आहे. मंगळवारी पहाटे अडीचच्या सुमारास त्यांची कार एका कंटेनरला धडकली. या दुर्दैवी घटनेत त्यांचा मृत्यू झाला. जुनमोनी राभा असे या महिला पोलीस अधिकाऱ्याचे नाव आहे. त्या उपनिरीक्षक पदावर कार्यरत होत्या. अपघाताच्या वेळी कारमध्ये त्या एकट्याच होत्या. शिवाय त्यांनी आपला पोलीस गणवेशही परिधान केला नव्हता.

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, हा अपघात नागाव जिल्ह्याच्या जाखलाबंधा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मंगळवारी पहाटे घडला. मृत महिला पोलीस अधिकारी जुनमोनी राभा या 'लेडी सिंघम' किंवा 'दबंग कॉप' या नावानं ओळखल्या जायच्या. जेव्हा अपघात घडला तेव्हा त्यांच्याबरोबर कोणतीही सुरक्षा व्यवस्था नव्हती, शिवाय त्यांनी पोलिसांचा गणवेशही परिधान केला नव्हता. त्या एकट्याच कारने अप्पर आसामच्या दिशेने जात होत्या. "पहाटे अडीचच्या सुमारास सूचना मिळाल्यानंतर, पोलिसांच्या गस्ती पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जुनमोनी यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखलं केलं. पण तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं," अशी माहिती जाखलाबंधा पोलीस ठाण्याचे प्रभारी पवन कलिता यांनी दिली.मृत जुनमोनी राभा या मोरीकोलॉन्ग पोलीस ठाण्यात उपनिरीक्षक पदावर कार्यरत होत्या. गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यासाठी त्यांना ओळखलं जात होतं. शिवाय एका आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी आरोप झाल्यानंतरही त्या चर्चेत आल्या होत्या. अलीकडेच त्यांच्या घरावर पोलिसांनी छापेमारी केली होती. गेल्या वर्षी जुनमोनी यांनी एका फसणुकीच्या प्रकरणात आपल्या होणाऱ्या नवऱ्याला अटक केली होती.

## बिल्डरची १.८० कोटींना फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** बिल्डरची फसवणूक केल्या प्रकरणी क्रिएटीव्ह इंफ्रास्ट्रक्चरच्या दोन संचालकांना हुडकेश्वर पोलिसांनी अटक केली तर अन्य तिघे फरार झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पांडूरंग महादेव मुलार (नंदनवन), नितीश कृष्णराव तुंगार (रेशिमबाग), विलास श्रीराम मूर्ती (रमनामारोती),सुभाष दयाराम लांबट (रेणूकामातानगर) आणि जितेश नामदेव मदनकर यांनी क्रिएटीव्ह इंफ्रास्ट्रक्चर नावाने कंपनी स्थापन केली. २०१२ मध्ये हुडकेश्वरातील एका भूखंडावर फ्लॅट स्किम बांधण्याची घोषणा केली.

त्यासाठी २०२२ पर्यंत संचालकांनी अनेकांकडून लाखो रुपये घेतले. मात्र, बांधकाम केले नाही. त्यामुळे गुंतवणुकदारांनी संचालकांच्या कार्यालयात वारंवार फेऱ्या मारल्या. शेवटी फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने गुंतवणुकदारांनी कोतवाली पोलीस ठाण्यात क्रिएटीव्ह इंफ्रास्ट्रक्चरच्या संचालकांच्या विरुद्ध तक्रार केली. पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. प्रकरण न्यायालयात गेले. न्यायालयाने गुंतवणुकदारांची रक्कम परत करण्याचे आदेश दिले.



# भारत-पे ला फटकारलं

आधुनिक केसरी

भारत पे आणि कंपनीचे माजी व्यवस्थापकीय संचालक अशनीर ग्रोव्हर यांच्यातला वाद आता कोर्टापर्यंत जाऊन पोहोचला आहे. दोन्ही बाजूंनी ट्विटरवर एकमेकांवर कुरघोडी करणारे ट्वीट्स केले जात आहे. मात्र, या शाब्दिक वादामध्ये खालच्या पातळीवर जाऊन टीका केली जात असल्याचं दिसू लागलं आहे. या पार्श्वभूमीवर आज दिल्ली उच्च न्यायालयाने या दोघांनाही फैलावर घेतले आहे. तसेच, दोन्ही बाजूंनी एकमेकांवर टीका करताना असंसदीय शब्दांचा वापर करू नये, असेही न्यायालयाने सुनावले आहे. अशनीर ग्रोव्हर आणि त्यांच्या कुटुंबीयांनी कंपनीवर अपमानजनक टिप्पणी करू नये, या मागणीसाठी करण्यात आलेल्या याचिकेवर सध्या न्यायालयात सुनावणी चालू आहे. अशनीर ग्रोव्हर आणि त्यांच्या कुटुंबीयांना यासंदर्भात कंपनीबाबत टीका-टिप्पणी करण्यापासून कायमची बंदी घातली जावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. त्यावरच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने परखड मत व्यक्त केले आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रतीक जालान यांच्या एकसदस्यीय खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी चालू आहे. यासंदर्भात दोन्ही बाजू ऐकल्यानंतर न्यायालयाने सुनावणीसाठी पुढची तारीख दिली. मात्र, असे करताना दोन्ही बाजूंना फटकारले.
ही याचिका पुढील सुनावणीपर्यंत राखून ठेवतानाच न्यायालयाची दोन्ही बाजूच्या सन्माननीय वकिलांना विनंती आहे की त्यांनी आपापल्या अशीलांना समज द्यावी. त्यांच्या अशीरांनी एकमेकांविरोधात असंसदीय भाषेत टीका-टिप्पणी टाळावी, असे न्यायमूर्ती जालान यांनी नमूद केले. भारतपेच्या तक्रारीवरून दिल्ली पोलिसांनी अशनीर ग्रोव्हर आणि त्यांच्या कुटुंबीयांविरोधात तक्रार दाखल केली. तेव्हापासून दोन्ही बाजूंनी एकमेकांवर टीकेचा कलगीतुरा सुरू झाला. यासंदर्भात टिप्पणी करतानाच न्यायमूर्ती जालान यांनी संतप्त मत व्यक्त केले. ही काही रस्त्यावरची भांडणे नाहीत. तुम्ही जर गटारात राहायचे ठरवलेच असेल, तर मग कृपया गटारात राहा, असे न्यायमूर्तींनी म्हटल्याचे बार अँड बेंचने आपल्या ट्वीटमध्ये नमूद केले आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी २४ मे रोजी आहे. अशनीर ग्रोव्हर आणि भारतपे यांच्यादरम्यानच्या वादावर दिल्ली उच्च न्यायालयाने ९ जानेवारी रोजी दोन्ही बाजूंना एकमेकांवर टीका करताना भान ठेवण्याचे निर्देश दिले. मात्र, भारत पे ची बाजू न्यायालयात मांडणाऱ्या वकिलांच्या युक्तिवादानुसार १० मे रोजी कंपनीने अशनीर ग्रोव्हर यांच्याविरोधात दिल्ली पोलिसांत तक्रार दाखल केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांनी अचानक आक्रमकपणे आणि खालच्या पातळीवर ट्विटरवर टीका करायला सुरुवात केली. अशनीर ग्रोव्हर आणि त्यांच्या पत्नी माधुरी जैन ग्रोव्हर यांच्याविरोधात बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यांच्या या कृतीमुळे कंपनीला ८१ कोटींचे नुकसान झाल्याचाही दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

# धार्मिक दंगली जबाबदार कोण ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र संताची भुमी म्हणून ओळखला जातो. अनेक संत येथे होऊन गेले. संतांनी सामाजिक प्रबोधन करून विषमता, अंधश्रद्धा, पाखंड, भोंदुगीरी विरोधात आवाज उठवून माणसाला माणूस म्हणून जगण्याची शिकवण दिली. स्त्रिपुरुष समतेच्या विचाराची पेरणी केली. महाराष्ट्रातील याच शिकवणुकिचा प्रसार प्रसार देशभर व देशाबाहेर ही झाला म्हणून महाराष्ट्राताला पुरोगामी राज्य म्हणून ओळखही निर्माण झाली. चार्तुवर्णाचे जातीमध्ये विघटन होऊन माणसाला माणसापासून दुर नेऊन अंधश्रद्धा व पाखंडपणाच्या नावाखाली लोकांना माणसिक गुलाम बनवले आणि आर्थिक, मानसिक व सामाजिक शोषण करून प्रगतीचे द्वार कायमचे बंद केले.**

अनेक संतानी माणसिक गुलामगिरी तोडून माणसाला माणूस म्हणून शिकवण देण्याचा प्रयत्न केला. विषमता, भोंदुगीरी, पाखंडापासुन समाजाची जागृती करण्याचा प्रयत्न केला. संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज, संत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज यांनी तर विषमता, अंधश्रद्धा, पाखंड भोंदुगीरी निर्माण करणाऱ्या पुरोहित ब्राम्हणांवर कडाडून टिका टिपणी करून समाजाला योग्य दिशा व मार्ग दिला. अंधश्रद्धेच्या नावाखाली चमत्कार, जादूटोणा हे लोकांना भुलवून शोषण करून व्यवस्था कायम ठेवण्याचे षडयंत्र आहे. म्हणून संतांनी सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा, जादूटोणा, विषमता, भोंदुगीरी, होम हवन या विरोधात जागृती करून माणुस व त्यांचे कर्म कसे श्रेष्ठ असतात याची जाणीव करुन दिली. संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज, संत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज हे सर्वच संत आजही पूजनीय व वंदनीय आहेत. परंतु यांनी कधीच धर्माच्या नावाखाली चमत्कार केला नाही, धर्माच्या नावाखाली धनसंचय केला नाही. जादुटोणा, करून, अंगारा भंगारा देऊन कोणतेही दुःख निवारण केले नाही. फक्त लोकांना माणूस म्हणून त्याचा सर्वांगीण विकासासाठी जनजागृती करून माणसाचे कल्याण होइल अशीच शिकवण दिली. संतानी हे सर्व करताना कधीच कोणत्याही धर्माचा गौरव केला नाही किंवा कोणताही धर्माचा तिरस्कार केला नाही. केवळ समोरच्या ला माणूस म्हणून जागृत केले व उपदेश केला म्हणून आजही संताचे विचार वाचले तर माणुस म्हणून प्रत्येकाला लागु होतात. धर्माचा कुठे ही उल्लेख न केलेल्या संतांनी कर्माला किंमत देण्याचा उपदेश करून माणसाला माणूस म्हणून बघण्याचा दृष्टिकोन दिला. परंतु हल्ली संताचे विचार पायदळी तुडवून राजकीय पोळी भाजणाऱ्या लोभी व स्वार्थी लोकांनी धर्माच्या नावाने मते मागायला सुरवात केली आणि माणसापेक्षा धर्माला जास्त महत्त्व देण्याचा व माणसाला माणसापासून दुर करण्याचा प्रयत्न राज्यकर्ते जाणीव पुर्वक करत आहेत. संख्येने जास्त असून सत्ता संपती जास्त असुनही एकच धर्म धोक्यात असल्याचा अंजेडा समता विरोधी लोकांनी राबवून त्यामाध्यमातून मते मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. मतांचे राजकारण करण्यासाठी धर्माला धोक्यात दाखवून माणसाला भयभीत करत आहेत. हजारो वर्षांपासून चालत आलेली विषमतावादी, अंधश्रद्धावादी, हक्क अधिकार नाकारणाऱ्या व्यवस्थेच्या चालकाला लोक जागृत व्हायला पाहिजे असे अधिच वाटले नाही. म्हणून लोकांना संताचे विचाराची माहिती होऊन सत्य विचाराची जाणिव होऊ नये म्हणून यांनी अंधश्रद्धा, पाखंड, भोंदुगीरी ला वारंवार महत्त्व देऊन धर्म महत्वाचा आहे म्हणून धर्माच्या आडून मताचे राजकारण करून, लोकांना अज्ञान व अंद्धश्रद्धाळू बवण्याचे काम सरकारच करते. अंधश्रद्धा, विषमता, भोंदुगीरी ला चालना मिळण्यासाठी भोनदु पाखंडी लोकांना लोकांच्या समोर आणले जाते, त्याची जाहिरात केली जाते. असे अनेक ढोंगी, पाखंडी, भोंदु लोक तयार झाले कि जे धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा पसरवून धर्म धोक्यात आहे असे सांगत समाजात द्वेष, मत्सर पसरवून लोकांच्या डोक्यात चुकिच्या गोष्ट पेरतात. सरकार अशा भोंदु, पाखंडी लोकांच्या मंचावर जाऊन त्यांच्या पाया पडतात. सर्वसामान्य लोकांना वाटतं मंत्री पाया पडतो आपण तर सर्वसामान्य आहेत म्हणून भक्त गर्दी करतात. जमलेल्या गर्दीला केवळ आणि केवळ काल्पनिक गोष्टी, धर्माची कट्टरता शिकवून धर्म धोक्यात आहे असे सांगतात. सरकार ही धर्माच्या नावाने राजकारण करून लोकसंख्या ने जास्त असुनही धर्म धोक्यात कसा येतो ? हेच कळत नसले तरीही द्वेष, मत्सर पसरवून भक्त कंपनी तयार केली जाते. भक्त लोकांच्या भावना खुप लवकर भडकतात आणि मग ते धर्माच्या रक्षणासाठी रस्त्यावर येऊन, इतर धर्म जातीविषयी तिरस्कार निर्माण होईल, अवमान होइल असे बोलून यातून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. सार्वजनिक ठिकाणी विषमतावादी कृत्य करून, भडकाऊ बोलण्याचा प्रयत्न करतात. कोणी थांबवण्याचा प्रयत्न केला तर त्याचे रूपांतर दंगली मध्ये होते. मुळात संख्या जास्त,




प्रशासनात जास्त, आमदार खासदार जास्त व सरकारही धर्माचे असुन नेमका धर्म धोक्यात येतोच कसा हा मात्र संशोधनाचा प्रश्न आहे. दुसरी गोष्ट लाखो लोकांचे आर्थिक व माणसिक शोषण करून चमत्कार व दैवी शक्तीच्या नावाखाली, अद्भूत शक्तीच्या नावाखाली लोकांच्या समस्या सोडविणारे धर्माचे अनेक जादुगार आहेत. मग अद्भुत दैव शक्ती असताना, धर्म धोक्यात येतो कसा ? दैवशक्ती व चमत्कार काही लोक निरस्त करू शकतात ? एकिकडे दैवशक्तीचे गुणगान यायचे आणि दुसरीकडे धर्म धोक्यात आहे म्हणायचे. दैवशक्ती धर्माला धोका निर्माण करणाऱ्या लोकांना का थांबवत नाही. एवढे तपस्वी लोक असताना धर्माचे संरक्षण करण्यासाठी लोकांना का भडकवले जाते ? सरकारला जर वाटतं धर्म धोक्यात आहे. आमदार, खासदार, सरकार, दैवशक्ती, चादुटोणा करणारे, भविष्य सांगणारे, चिठ्ठ्या लिहून अगोदरच माहिती मिळवणाऱ्यांकडून धर्माचे संरक्षण होत नसेल तर धर्म कमकुवत आहे का हा प्रश्न उपस्थित होतो. लोकांचे रक्षण करणे सरकारचे काम आहे. धर्माचे रक्षण करण्यासाठी धार्मिक संस्था कार्यरत असतात. आणि सत्तेतील लोकांना धर्म धोक्यात आहे असे वाटत असेल तर सत्ता सोडून धार्मिक संस्थेचे काम करून धर्म वाचवण्याचे काम करावे. परंतु सत्तेच असताना तुम्हाला धर्म नाही कर्मावर लक्ष द्यावे लागेल. आणि माणसासाठी काम करावे लागेल. सत्ता हाती घेऊन लोकांचे काम न करता जनतेच्या पैशाने अंधश्रद्धा, पाखंड, भोंदुगीरी ला सरकारने सहकार्य करून नये. कारण सरकारच असे काम करत आहे म्हणून भक्त लोक इतर धर्मिया बाबत आक्रमक भुमिका घेऊन दंगली निर्माण केल्या जात आहेत. शेवगाव व अकोला त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. दंगली मध्ये ज्यांच्यामुळे दंगल झाली त्यांच्या वर कठोर कार्यवाही सुद्धा होत नाही बऱ्याच वेळी धर्माच्या नावाखाली आरोपींना निर्दोष सोडून निरापराध लोकांना शिक्षा केली जाते. गुजरात दंगल, भिमाकोरेगाव दंगल मधील आरोपींना अजूनही शिक्षा तर नाही पण त्यांना मानसन्मान दिला जातो. अशा कृत्यामुळे धर्माच्या नावाखाली दंगली करण्याचे मनोबळ आरोपींचे वाढते. बलात्कारी लोकांना जेल मधुन बाहेर काढून त्यांचा सत्कार करणारे जर सत्तेशी असतील तर याचा अर्थ धार्मिक दंगली निर्माण करायला सरकारच जबाबदार आहे. सरकारने जनतेला शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा देऊन महागाई नियंत्रणात आणण्याचे काम करणे आवश्यक असते. परंतु सरकारने लोकांना एवढे धार्मिक बनवले की भक्त लोक शिक्षण, रोजगार, आरोग्य व महागाई यावर न बोलता सरकारने लोकांच्या समोर गोमूत्र, गोबर, गाय हे मुद्दे अत्यंत ज्वलनशील मुद्दे बनवले आहे. गाय, गोबर, गोमुत्रावर राजकारण करणाऱ्या सरकारने शिक्षण, रोजगार कमी केल्याने धार्मिक दंगली मध्ये तरुणांचा वापर होत आहे. भक्त तरुणांना धर्माचे संरक्षण करताना मेलो तरी चालेले यात धन्यता मानणारे लोक दंगलीमध्ये सहज केसेस अंगावर घेऊन स्वतः चे भवितव्य उद्ध्वस्त करत आहेत. परंतु धर्माच्या नावाखाली याची जाणीव राहली नाही. तरुणांच्या हाताला रोजगार न देता डोक्यात धर्म पेरणारे व धर्मा विषयी तरुणांना भडकवण्याचे काम सरकार व सरकारच्या इलेक्ट्रॉनिक मिडिया कडून होत आहे. राज्यात वा देशात कुठेही दंगली होऊ शकतात असे अनेक सुशिक्षित व जागृत लोक बोलत आहेत. याचाच उघड उघड सरकार धार्मिक दंगली घडवण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. म्हणून तरुणांनी डोक्यातून धर्म थोडा बाजूला काढून कर्मावर लक्ष द्यायला पाहिजे. धर्म समजून घेताना लोभी राजकारणी लोकांचे नाही तर संताचे विचार वाचुन समजून घ्यायला पाहिजे. संताचे विचार समजून घेताना थोडे वेगळे नक्की वाटेल कारण राजकारणी लोकांनी धर्माच्या नालाखाली अंधश्रद्धा, पाखंड, भोंदुगीरी व विषमतेला भावनिक बवनले परंतू संतानी वरिल सर्व गोष्टी नाकरून मानावच्या कल्याणासाठी प्रबोधन केले. राजकारणी लोकांनी सत्तेसाठी धर्माचा वापर करून तरुणांचा गैरवापर करणे सुरू आहे. म्हणून धार्मिक दंगल जर कुठे घडत असेल तर आणि दंगलखोरांना शिक्षा होत नसेल तर लोकांनी सरकारलाच शिक्षा मिळाण्याचा आग्रह करावा. कारण धार्मिक दंगलीमध्ये सर्वसामान्य लोकांचे नाही तर राजकारणी लोकांचे हित आहे. म्हणून दंगली कुठे झालीच आणि योग्य ते दंगलखोर पकडले नाही तर त्या दंगलीची जबाबदारी सरकारचीच आहे हे लक्षात घ्यावे.

# सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकण्यापासून सावध रहा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**सोशल मीडियावर चिथावणीखोर पोस्ट टाकणे किंवा अफवा पसरवणे हे सायबर गुन्ह्याखाली येते. माहिती तंत्रज्ञान कायदा-२००० भारतीय दंड संहिता चे कलम १५३ ए आणि आय पी सी चे कलम-५०५ अंतर्गत अशा गुन्हेगारांवर कारवाई केली जाऊ शकते. सोशल मीडियाच्या माध्यमातून कोणत्याही धर्माच्या किंवा जातीच्या भावना दुखावल्यास किंवा दंगली भडकावल्यास दोषींना जन्मठेपेपर्यंतची शिक्षा होऊ शकते, असे कायदेतज्ज्ञांचे म्हणणे आहे. धर्म, वंश, दोन गट, जन्मस्थान किंवा निवासस्थान किंवा भाषेच्या नावावर द्वेष पसरवणाऱ्यांविरुद्ध आयपीसीच्या कलम-१५३ ए अंतर्गत गुन्हा दाखल केला जाऊ शकतो.**

त्याचप्रमाणे, जर एखाद्या व्यक्तीने बोलणे, लिहून, इशारा करून किंवा इतर कोणत्याही प्रकारे जातीय वातावरण बिघडवले तर त्याच्यावर आयटी ॲक्ट आणि आयपीसी अंतर्गत गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. हा अजामीनपात्र गुन्हा आहे. पोलीस आरोपीला तत्काळ अटक करू शकतात. दोषींना तीन वर्षांचा तुरुंगवास आणि दंडही होऊ शकतो. अफवा पसरवल्याबद्दल आयपीसीच्या कलम-५०५ अंतर्गतही कारवाई केली जाऊ शकते. तीन वर्षांच्या कारावासाची तरतूद आहे.

राज्यघटनेच्या कलम १९ (१/१) (A) नुसार सर्व नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्याचा प्रसार करण्यात इंटरनेट आणि सोशल मीडियाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तथापि, हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आपण कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करत नाही आणि इतरांना दुखापत किंवा हानी पोहोचवू नये यासाठी आहे. तुमच्या कोणत्याही पोस्टवर किंवा कोणतीही पोस्ट शेअर करून कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या किंवा दोन समुदायांमध्ये द्वेष निर्माण झाला तर तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते. भारतीय संसदेने सायबर गुन्हे रोखण्यासाठी माहिती कायदा म्हणजेच IT कायदा २००० साली लागू केला. याअंतर्गत तुम्ही फेसबुक, ट्विटर, टिक टॉक, शेअर चॅट, यूट्यूबसह इतर सोशल मीडियावर कोणत्याही प्रकारची आक्षेपार्ह, भडकाऊ किंवा द्वेष निर्माण करणारी पोस्ट, व्हिडिओ किंवा चित्र शेअर केल्यास तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते. तसेच दंड भरावा लागू शकतो. यासंबंधीचे ताजे प्रकरण महाराष्ट्रातील अकोला व अहमदनगर जिल्ह्यातुन शेगांव येथून समोर आले आहे. सोशल मीडियावरील विवादित पोस्ट वरून दोन गटात हाणामारी झाली व हिंसा झाली. अहमदनगरमध्ये मिरवणुकीत हिंसाचार १४ मे रोजी रात्री अहमदनगरमधील शेवगाव येथे दोन्ही बाजूंनी दगडफेक झाली होती. वास्तविक, छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त रात्री ८ वाजता मिरवणूक काढण्यात आली असता, अचानक एका गटाने दगडफेक केली. दुसरी घटना अकोलात घडली.इन्स्टाग्रामवरील एका वादग्रस्त पोस्टबाबत अनेकांनी पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली होती. दरम्यान, पोलिस ठाण्यात जमाव अनियंत्रित झाला आणि त्यांनी उपस्थित वाहनांची तोडफोड सुरू केली. काही वेळातच दुसऱ्या समाजाचे लोक पुढे आले आणि त्यांनी दगडफेक सुरू केली. दोन्ही बाजूंमध्ये जोरदार हाणामारी झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या सोडल्या.या वादग्रस्त इन्स्टाग्राम पोस्टमध्ये प्रेषित मोहम्मद यांचा अपमान करण्यात आल्याचा आरोप आहे. वादग्रस्त पोस्ट द केरळ स्टोरी या चित्रपटाशी जोडली गेली होती. धर्म, वंश, भाषा, निवासस्थान किंवा जन्मस्थानाच्या आधारावर विविध समुदायांमध्ये द्वेष पसरवण्याचा आणि सद्भावना बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध आय पी सी( IPC ) चे कलम १५३ ए A लागू केले जाते. या कलमांतर्गत तीन वर्षे कारावास आणि दंडाची तरतूद आहे. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या कलम ६७ मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की जर एखाद्याने इलेक्ट्रॉनिक माध्यमातून आक्षेपार्ह पोस्ट किंवा शेअर केले तर त्याच्यावर गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. याचा अर्थ असा की, टिक टॉक, शेअर चॅट, फेसबुक, ट्विटर यासह कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून विविध समुदायांमध्ये द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावर आयटी कलम ६७ अंतर्गत कारवाई केली जाते. आयटी कायद्याच्या कलम ६७ मध्ये असे म्हटले आहे की जर कोणी सोशल मीडियावर पहिल्यांदा असे करताना दोषी आढळले तर त्याला तीन वर्षांचा तुरुंगवास होऊ शकतो. यासोबतच ५ लाख रुपयांचा दंडही भरावा लागू शकतो. एवढेच नाही तर अशा गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास या प्रकरणातील दोषीला ५ वर्षांचा तुरुंगवास आणि १० लाख रुपयांपर्यंतचा दंड भरावा लागू शकतो. तज्ज्ञांच्या मते, सोशल मीडियाच्या कोणत्याही प्लॅटफॉर्मवरून होणारे गुन्हे रोखण्यासाठी आयटी कायदा लागू करण्यात आला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून कोणताही गुन्हा केल्यास त्या गुन्ह्यासाठी आयटी कायद्यानुसार शिक्षा दिली जाईल. सोशल मीडियावर लोकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही का, असे विचारले असता ते म्हणाले की, भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ (१) (ए) नुसार प्रत्येक नागरिकाला विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, परंतु हे स्वातंत्र्य अटींच्या अधीन आहे. या स्वातंत्र्याच्या अधिकाराच्या नावाखाली तुम्ही कोणताही गुन्हा करू शकत नाही. असे केल्यास तुरुंगात जावे लागू शकते आणि दंडही भरावा लागू शकतो. सायबर गुन्ह्यात जन्मठेपेपर्यंतची शिक्षा ॲडव्होकेट मार्कंडेय पंत म्हणतात की हॅकिंग, ऑनलाइन फसवणूक किंवा इतर कोणताही गुन्हा संगणक, इलेक्ट्रॉनिक उपकरण, वर्ल्ड वाइड वेब, मोबाइल किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे दंडनीय आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पाण्यासाठी वन्यप्राण्यांची भटकंती

## जंगलात पाण्याची व्यवस्था करावी : प्रा.जीवन कोलते पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** खळखळणारे नदीनाले... पाण्याने तुडुंब भरलेले डोह... झुळझुळ वाहणारे नद्यांचे प्रवाह... किलबिल करणारे पक्षी... कोकिळेचे मंजुळ गाणे... मोरांची म्यॉंव म्यॉंव... वृक्षवल्लींमध्ये वन्यप्राण्यांचा मुक्तसंचार...असे दृष्य आज रानावनात पाहायला मिळत नाही. कारण, निसर्गातील जीवन म्हणून ओळखला जाणारा अत्यंत महत्त्वाचा पाणी नावाचा घटक आटल्याने जंगलात पाण्यासाठी जणूकाही 'लॉकडाऊन' सुरू असल्याचे चित्र अनुभवास येत आहे. पाण्यासाठी वानरसेनेसह वन्यजीव नागरी वस्त्यांकडे कूच करीत आहेत.

चैत्र महिनाही संपुन आहे. वैशाखही लागला आहे. वैशाखापूर्वीच सूर्याने आग ओकणे सुरू केले आहे. त्यातच यावर्षी कधी नव्हे ते जवळपास १२२ वर्षानंतर एवढे तापमान वाढले आहे की तालुक्यात गत दोन महीन्यांपासुन ४१ अंशसेल्शीयस तापमान झालेले असल्याने जिवाची लाहीलाही होत आहे त्यामुळे निसर्गातील नदी, नाले, जलस्रोत आटले आहेत. उन्हाचे चटके आता जोरात बसत असतांना शहरातुन वाहणाऱ्या पुर्णा केळना धामना या नद्या उशाला तरीही कोरड घशाला पडत आहे.





कोरोनाचे सर्व शासकीय प्रशासकीय नियम शिथिल झालेले असतांना जंगलात मात्र कुठलेच 'लॉकडाऊन' नाही. तरीदेखील पाणवठ्याअभावी वन्यजीवांमध्ये 'लॉकडाऊन' सुरू असल्याचे चित्र आहे. पाणी मिळेल या आशेने वन्यप्राणी नागरी वस्त्यांच्या दिशेने कूच करीत आहेत. त्यात कांही हिंस्र प्राण्यांचाही समावेश आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात मानव व वन्यप्राण्यातील संघर्ष उद्‌भवू शकतो.पाण्याच्या शोधात असतांना कुंभारझरी सर्कल तथा अन्य दोन ठिकाणी बिबट्या हरणा तथा वन्य प्राणी विहीत पडल्याच्या घटना घडलेल्या आहे यात पाण्याच्या अभावामुळे काही दुर्मिळ वन्य पशु पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे हे वन्यप्राणी गावाकडे येऊ नये, यासाठी तालुक्यातील आरण्यात पाणवठे तयार करून वन्यप्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. मात्र, सध्या शासन निवडणुक, धर्म, जात, पंथ, यासह अन्य नागरीकांना नको असलेल्या बाबींमध्ये व्यस्त आहे. त्यामुळे वनविभागाचे याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. पाणवठ्यांअभावी जंगलात 'लॉकडाऊन' झाले असल्याने तहानेने व्याकूळ वन्यप्राण्यांची पाण्यासाठी भटकंती सुरू झाली आहे. उन्हामुळे नदिनाल्यांसह जमिनीतील पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटले आहेत. त्यामुळे पाण्याच्या शोधात वन्यप्राणी व पक्षी शेतशिवाराकडे येत आहेत. शेतात असलेले रब्बी व उन्हाळी पिकेही संपुष्टात आले आहेत. प्राणी व पक्षी गावालगतच्या शेतवस्तीकडे पाणी पिण्यासाठी येतात. त्यामुळे अशा ठिकाणी प्राण्यांची शिकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे वनविभागाने नियोजन करून वन्य प्राण्यांकरीता पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी भाजपाचे तालुका उपाध्यक्ष प्रदीप चव्हाण नादातांडा यांनी केली आहे. फर्दापूर, सावळदबारा व सोयगाव तालुक्याच्या चहूबाजूंच्या जंगलात हरिण, काळवीट, मोर, लांडोर, ससे, बिबट्या, कोल्हे, लांडगे, सायाळ, रानडुक्कर, माकड व इतर जंगली प्राणी आहेत. तर काही जंगलात काळवीट व हरणाचे कळपच्या कळप दृष्टीस पडतात. वनविभागाने या वन्यप्राण्यांचे रक्षण करणे गरजेचे आहे.

> वनविभागाने त्वरित पाणवठे तयार करावेत
> दरवर्षी वनविभागाकडून उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच जंगलात वन्यप्राण्यांकरिता कृत्रिम पाणवठे तयार केले जात नाहीत . यावर्षीही भयावह तापमान वाढवुनही याकडे दुर्लक्ष होत आहे . पाण्यासाठी वन्यप्राण्यांची भटकंती सुरू झाली आहे . तरी वनविभागाने त्वरित "ॲक्शन मोड'मध्ये येऊन कृत्रिम पाणवठे तयार करावेत . वन्यप्राण्यांसह पशुपक्षांसाठी पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी प्रा .जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी केली आहे .

# शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना दक्षता घ्यावी: एस.जी. वाघ

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना काळजी दक्षता घ्यावी, तसेच गुणवत्ता आणि दर्जाची हमी देणाऱ्या अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदीस प्राधान्य द्यावे, असे आवाहन कृषि विभागातर्फे तालुका कृषी अधिकारी एस.जी.वाघ व मंडळ अधिकारी आर.जी.गुंडिले करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी बनावट, भेसळयुक्त बियाणे खरेदी टाळण्यासाठी अधिकृत विक्रेत्यांकडून देयकासह खरेदी करावे. बिलावर बियाण्याचा संपूर्ण तपशील यात पीक, वाण, संपूर्ण लॉट नंबर, बियाणे कंपनीचे नाव, किंमत आणि आपण स्वतः बिलावर स्वाक्षरी, अंगठा देऊन विक्रेत्याची स्वाक्षरी असल्याबाबत खात्री करावी. खरेदी केलेल्या बियाण्यांचे वेष्टन, पिशवी, टॅग, खरेदीचे देयक आणि थोडे बियाणे पिकाची कापणी होईपर्यत जपून ठेवावे. खरेदी केलेले बियाणे त्या हंगाम साठी शिफारस केलेले असल्याची खात्री करावी. भेसळीची शंका दूर करण्यासाठी बियाण्याची पाकीटे, बॅग सिलबंद, मोहोरबंद असल्याची खात्री करावी. बियाणे उगवणीच्या खात्रीसाठी पाकीट, बॅगवरील अंतिम मुदत पाहून घ्यावी. कमी वजनाच्या निविष्ठा तसेच छापील किंमतीपेक्षा जास्त किंमतीने विक्री अथवा इतर तक्रारीसाठी नजिकच्या सोयगाव कृषि विभागाचे कृषि अधिकारी, पंचायत समिती, तालुका कृषि अधिकारी, यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषि अधिकारी एस.जी.वाघ व मंडळ अधिकारी आर.जी.गुंडिले सोयगाव यांनी केले आहे.

# नितीन पाटील यांनी घेतली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत शिवसेना प्रणीत शिवशाही पॅनलच्या उमेदवारांनी बाजी मारत कन्नड कृषी उत्पन बाजार समिती वर एकहाती सत्ता प्रस्थापित केली. माजी आमदार नितीन पाटील यांच्या सह मार्केट कमिटीचे नवनिर्वाचित संचालक मंडळ व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे तसेच कृषिमंत्री अब्दुल सत्तार व मंत्री संदीपान भुमरे यांची भेट घेतली यावेळी विविध विषयांवर सखोल चर्चा झाली. या विजयाबद्दल मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याहस्ते मुंबई येथे नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांच्यासह माजी आ. तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख केतन काजे, जिल्हा बँकेचे संचालक डॉ. मनोज राठोड, जिल्हा दूध संघाचे संचालक गोकुळसिंग राजपूत, माजी उपनगराध्यक्ष अब्दुल जावेद, कैलास आकोलकर आदिंसह नवनिर्वाचित संचालक तसेच कन्नड तालुका शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.





# पत्रकार साळवे यांना समाजभूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सिद्धार्थ मित्र मंडळाच्या वतीने निळे प्रतीक या वृत्तपत्राचे संपादक, तथा एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनचे अध्यक्ष रतनकुमार साळवे यांना सिद्धार्थ मित्र मंडळाच्या वतीने दिलेला, प्रतिष्ठेचा समजला जाणारा, समाजभूषण पुरस्कार देऊन मान्यवराच्या हस्ते गौरविण्यात आले. रतनकुमार साळवे यांच्या कार्याची वेळोवेळी समाजाने दखल घेतली आहे. आतापर्यंत त्यांना विविध संस्था, संघटनाच्या वतीने ३५ पुरस्कार मिळालेले आहे. यामध्ये राज्यस्तरीय ५पुरस्कार आहेत. ते गेल्या २० वर्षापासून पत्रकारीता क्षेत्रात कार्यरत आहेत. सामाजिक क्षेत्रात त्यांच्या कामाची चुनक आपल्याला प्रकर्षाने बघायला मिळते. तें एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशन अध्यक्ष आहेत. त्यामुळे सर्वसामान्यसोबतच पत्रकारांचे प्रश्न देखील तें हिरीरीने सोडवत असतात. सामाजिक कार्यात आपल्या कार्यकर्तृत्वाचा त्यांनी ठसा उमटवलेला आहे.तें तीन विषयात पोस्ट ग्रॅज्युट असल्यामुळे समाजाच्या प्रश्नांची त्यांना जाण आहे. आपल्या निळे प्रतीक या वृत्त पत्रातून तें वंचित, पिढीत घटकाला सातत्याने न्याय देत असतात. अन्याय अत्याचारला वाचा फोडत असतात. समाजसेवा, आपण समाजाचे काही देणं लागतो हा विचार समोर ठेवून त्यांचे कार्य सुरु आहे. निळे प्रतीक बहूउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अंतर्गत ते समाज उपयोगी विविध कार्यक्रमाचे आयोजन देखील करत असतात. कोरोना काळात लॉक डाऊन असताना त्यांचे कार्य हे उल्लेखनीय असेच आहे. त्यांच्या एकूणच कार्याची दखल घेऊन त्यांना प्रो.शरद बाविस्कर ( जवाहरलाल नेहरू विद्यालय, नवी दिल्ली ) यांच्या हस्ते रविवारी औरंगाबाद मध्ये समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराने सर्वं स्तरावरून त्यांचे अभिनंदन होत आहे. या कार्यक्रमप्रसंगी सिद्धार्थ मित्र मंडळाचे अध्यक्ष, प्रकाश कांबळे, प्रा. किसन चव्हाण, सुधाकर मेश्राम, एम.एन. ढाकरगे, डॉ. संदेश भित्रे, एन. डी. जिवणे, एल एस. कांबळे, एस के. कांबळे आदीची उपस्थिती होती. हा सोहळा मौलाना आझाद संशोधन केंद्र टी.व्ही सेंटर औरंगाबाद येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्विनी मनवर यांनी केले तर आभार सुधाकर मेश्राम यांनी मानले.

महाराष्ट्र Business Katta












# कृत्रिम बुद्धिमत्ता पूर्णपणे नाकारता येईल का ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवजातीसाठी एक मोठी उपलब्धी असू शकते, जर ती मानवजातीच्या कल्याणासाठी आणि मानवजातीच्या नियंत्रणाखाली वापरली गेली असेल तर.मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर निसर्गातील अनेक न उलगडलेली रहस्ये उलगडली आहेत, परंतु त्याने विकसित केलेली कृत्रिम बुद्धिमत्ता आता त्याच्या भविष्यासाठी एक मोठे आव्हान उभा करत आहे. आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रणेते जेफ्री एव्हरेस्ट हिंटन यांनीही स्वतःचे एआय तंत्रज्ञान मानवतेसाठी धोकादायक असल्याचे म्हटले आहेच, शिवाय या तंत्रज्ञानाच्या विकासाबद्दल माफी मागून त्यांनी गुगलची नोकरीदेखील सोडली आहे.**

याची दखल घेणं महत्त्वाचं आहे. जेफ्री हिंटन यांनी 1970 मध्ये प्रायोगिक मानसशास्त्रात पदवी घेतल्यानंतर 1978 मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये डॉक्टरेट मिळवली. ते मानसशास्त्र आणि तंत्रज्ञान या दोन्हींचा विद्यार्थी असल्याने, कोणतेही यांत्रिक तंत्रज्ञान मानवी नियंत्रणाच्या पलीकडे गेल्यास सृष्टी आणि मानवतेचे किती नुकसान करू शकते हे त्याला चांगलेच समजून चुकले आहे. जेफ्री हिंटन हे आपल्या काळातील एकमेव शास्त्रज्ञ नाहीत ज्यांनी तंत्रज्ञानाच्या धोक्यांकडे लक्ष वेधले आहे आणि जबाबदार लोकांना या धोक्याबद्दल सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.स्टीफन हॉकिंग यांनीही शास्त्रज्ञांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या धोक्यांबाबत इशारा देताना सांगितले की, यंत्रांना बुद्धिमत्ता देणे ही मानवी इतिहासातील सर्वात वाईट घटना असल्याचे सिद्ध होऊ शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवी समूहाच्या दृष्टीने विनाशकारी ठरण्याचा इशारा अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने एका अहवालाद्वारे दिला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील काही तज्ज्ञांनीही तसाच इशारा देऊन याबाबतीत सध्या सुरू असलेले प्रयोग आहे त्या स्थितीत तातडीने थांबविण्याचे आवाहन केले आहे. स्पेस एक्स'चे प्रमुख अलन मस्क यांनीही हे प्रयोग तूर्त थांबवावेत, असे आवाहन केले आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जगभरातील कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील 327 विशेषज्ञांची मते आजमावून आपला हा अहवाल तयार केला आहे. या अहवालात असा दावा करण्यात आला आहे की, कृत्रिम बुद्धिमत्ता हे तंत्रज्ञान काहीवेळा वापरकर्त्यास भ्रमित करण्याचा धोका आहे. तसेच या तंत्रज्ञानाचा वापर करून काही बाबतीत पक्षपात करणेही शक्य आहे. सर्वात मोठा धोका म्हणजे, जगभरातील दहशतवादी संघटना या तंत्रज्ञानाचा गैरवापर करून ठिकठिकाणी दहशतवादी कारवाया घडवून आणू शकतात. तसे झाल्यास जगभरात अनेक समस्या नव्याने निर्माण होण्याची भीती या अहवालात व्यक्त करण्यात आलेली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अनेक खोट्या बातम्या प्रसारित झाल्याने हेच दिसून येते की, मानवी बुद्धिमत्तेला पर्याय म्हणून जे तंत्रज्ञान आपण स्वीकारण्याचा प्रयत्न करत आहे, ते मनमानी करू लागले तर काय काय दिवे लावू शकतो, हे लक्षात यायला हरकत नाही.त्या 'टूल' द्वारा अनेक लोकांचा मृत्यू झाल्याच्या खोट्या बातम्या इंटरनेटच्या माध्यमातून प्रसारित केल्या गेल्या. या अहवालांमध्ये अमेरिकेचे अध्यक्ष जो बिडेन यांच्या मृत्यूच्या खोट्या बातम्यांचाही समावेश होता.

ज्या क्षेत्रात मानवी श्रम वापरण्याची शक्यता धोक्यात येईल अशा क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करण्यास महात्मा गांधींचा विरोध होता. कृत्रिम बुद्धिमत्तेचे आधुनिक रूप येत्या काळात लाखो लोकांच्या नोकऱ्या हिरावून घेऊ शकते. आणि हे केव्हा घडतंय तर लोकसंख्या आणि बेरोजगारी या दोन्ही गोष्टी वाढत आहेत तेव्हा! त्यामुळे हा ट्रेंड समाजरचनेला नवे आव्हान बनू शकतो. वस्तूंच्या उत्पादनाच्या प्रक्रियेत जर यंत्रमानव गुणवत्ता नियंत्रण, उत्पादन, उत्पादनांची शिपमेंट अशी कामे करू लागले तर मानवी श्रमाची उपयुक्तता संपुष्टात येऊ शकते. लेखन, संपादन, अनुवाद, शिक्षण, वैद्यक अशी अनेक क्षेत्रे आहेत, जिथे कृत्रिम बुद्धिमत्ता मानवासाठी धोकादायक ठरत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स टेक्नॉलॉजी आपल्या मशीन्स किंवा कॉम्प्युटरच्या प्रोग्रामिंगनुसारच काम करू शकेल, असं म्हटलं जातं. परंतु मूरचा एक सिद्धांत आहे की मशीन्समध्ये अनेक वेळा स्वतः मध्ये सुधारणा करण्याची क्षमता असते. संगणक तंत्रज्ञानानेही हे सत्य सिद्ध केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या समर्थकांचे म्हणणे आहे की यंत्रे फक्त तेच करतील जे त्यांना प्रोग्राम केले आहे, तर मानवी बुद्धिमत्तेचे आकाश अमर्याद आहे. लेखन, खेळ, कला यासारख्या क्षेत्रांमध्ये, जिथे कल्पनाशक्ती आणि विचार करण्याची नवीन परिमाणे घेतात, तिथे मशीन मानवांशी स्पर्धा करू शकत नाहीत. पण 10 फेब्रुवारी 1996 ची घटना लक्षात ठेवण्यासारखी आहे जेव्हा संगणकाने महान बुद्धिबळपटू गेरी कास्पारोव्हचा पराभव केला. असे नाही की कृत्रिम बुद्धिमत्ता हा मानवांसाठी पूर्णपणे नवीन अनुभव आहे. ड्रायव्हरलेस कार वापरणे, गुगल असिस्टंट, अलेक्सा किंवा सिरी वापरणे, संगणकाद्वारे विविध डेटाचे विश्लेषण करणे किंवा वर्गीकरण करणे यासारखी कामे लोक खूप वर्षांपासून करत आले आहेत. हे शक्य आहे की भविष्यात अशा तंत्रज्ञानाचा समावेश आपल्या मनगटाच्या घड्याळांमध्ये केला जाईल, जे आपल्या मनगटाची नाडी वाचून आपल्याला भविष्यात उद्‌भवू शकणाऱ्या आजारांपासून सावध करू शकेल. आमची पावले, हृदयाचे ठोके आणि रक्तदाब वाचणारे मनगटबंद ( घड्याळे ) आधीच बाजारात आहेत. आता मोबाईलच्या माध्यमातूनही काही ॲप्सचा वापर करून आपण आरोग्याच्या दृष्टिकोनातून अनेक शारीरिक हालचाली मोजू शकतो. वास्तविक, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे बहुतांश नियंत्रण मोबाईल फोनवरच पाहायला मिळते. तुम्ही एखाद्या विषयाचे एक किंवा दोन व्हिडिओ पाहता आणि अचानक तुम्हाला त्याच विषयाचे व्हिडिओ आणि त्यांच्याशी संबंधित जाहिराती तुमच्या मोबाइलवर येतात. तुमच्या शहराशी संबंधित जाहिराती तुमच्या स्क्रीनवर येतात आणि तुम्हाला भुरळ घालण्याचा प्रयत्न करतात.



हे अल्गोरिदम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तंत्रामुळे आहे, जे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा एक महत्त्वाचा घटक आहे. अल्गोरिदमद्वारे आर्टिफिशियल इंटेलिजन्स तुमची आवड आणि तुमच्या गरजा कॅप्चर करण्याचा प्रयत्न करते आणि या आधारावर बाजारवादी शक्ती तुमची क्षमता त्यांच्या हितासाठी वापरण्याचा प्रयत्न करतात. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आपल्या वापरकर्त्यांचा डेटा कोणालाही विकण्याच्या मुळाशी लोभ आणि हे तंत्रज्ञान आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा इतिहास सुमारे सत्तर वर्षांचा आहे. अमेरिकन संगणक शास्त्रज्ञ जॉन मॅककार्थी यांनी 1956 मध्ये ही संकल्पना मांडताना प्रथम कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शक्यतांवर चर्चा केली होती. त्यांचा असा विश्वास होता की कृत्रिम बुद्धिमत्ता हा संगणक विज्ञानाचा एक भाग असेल आणि त्याचे मूळ उद्दिष्ट अशी उपकरणे तयार करणे असेल जे मानवी नियंत्रणाशिवाय त्यांचे कार्य बुद्धिमानपणे करू शकतील. 1950 च्या दशकात कृत्रिम बुद्धिमत्तेवर काम सुरू झाले होते, परंतु 1970 च्या दशकात त्याला मान्यता मिळू लागली. या प्रकरणात जपानने 'फिफ्थ जनरेशन' नावाचा प्रकल्प सुरू केला होता, ज्यामध्ये सुपर कॉम्प्युटरच्या विकासासाठी दहा वर्षांचा कार्यक्रम आखण्यात आला होता. जपाननंतर ब्रिटनने 'एल्वी', युरोपियन युनियन 'एस्प्रिट'सारख्या योजना सुरू केल्या आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर नवीन संशोधनाचे काम जगभर सुरू झाले. कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व पूर्णपणे नाकारले पाहिजे असे नाही. याच्या मदतीने गंभीर आजारांचे निदान सहज करता आले, जर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांमुळे वंचित वर्गाला सहज उपलब्ध व स्वस्त उपचार शक्य होऊ शकतात, गंभीर आजारांची शक्यता अगोदरच ओळखता येते, उपेक्षित समाजाची परवड थांबवू शकतो, सर्वोत्तम आणि अर्थपूर्ण शिक्षण देऊ शकतो, हवामानाचा अचूक अंदाज लावू शकतो, सुरक्षेच्या संदर्भात आम्हाला मदत होऊ शकते, तर मग आपण त्याला प्राधान्य दिले पाहिजे. पण यातून लोकांमध्ये रोजगाराची चिंता वाढली तर आपण सावध व्हायला हवे. भारतासारख्या देशात, जिथे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात आहे, तिथे लोकांना नोकरीच्या संधींचे स्वतःचे असे एक महत्त्व आहे. औद्योगीकरणाच्या काळातही असेच धोके ठळकपणे मांडले गेले असले, तरी काळाने हे सिद्ध केले की जीवन नदीसारखे आहे, जी प्रतिकूल परिस्थितीतही आपला उत्कर्ष आणि अर्थपूर्ण प्रवाह कायम ठेवू शकते. होय, कोणत्याही परिस्थितीत यंत्राला मानवी नियंत्रणातून मुक्त करणे मानवतेच्या हिताचे ठरणार नाही, कारण शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, लेखक, विचारवंत यांनी अनियंत्रित यंत्रांचे धोके वारंवार स्पष्ट केले आहेत. मनाचा समतोल राखत आणि संयमी अंतःकरणाने कोणत्याही गोष्टीचा केलेला वापर माणसाला इतर प्राण्यांमध्ये श्रेष्ठ बनवतो. जर कृत्रिम बुद्धिमत्ता मानवजातीच्या कल्याणासाठी आणि मानवजातीच्या नियंत्रणाखाली वापरली गेली असेल. तर ती मानवजातीसाठी एक मोठी उपलब्धी असू शकते.

# माळवा- मध्यप्रदेश प्रांताचे पहिले सुभेदार !



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराजांनी उभे केलेले स्वराज्य निष्ठेने वाढविण्याची जबादारी सुभेदार मल्हारराव होळकरांनी आपल्या खांद्यावर घेतली होती. मराठी साम्राज्य वाढविण्याच्या कामी मल्हाररावांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि मराठी साम्राज्याच्या सीमा सिंधू नदीपर्यंत वाढविल्या. मल्हारराव होळकर हे आपल्या पराक्रमाने कसलीही घराणेशाहीची परंपरा नसतांना स्वबळावर पुढे येत मराठेशाहीचे मुख्य आधारस्तंभ बनले. ते एक धोरणी, मुत्सद्दी व शिवरायांच्या गनिमी काव्याला अंगीकारणारे सेनानी होते. अंगी गुण असले, वीरश्री असली तर एक सामान्य धनगर मुलगा भारताच्या इतिहासाला घडवणारा महानायक कसा बनू शकतो, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले.**

त्यांनी दाभाड्यांचा एक सरदार कंठाजी कदमबांडे यांच्या पेंढारी टोळीतून आपली कारकीर्द सुरू केली. शिपाईगिरी करीत असताना तरुण बाजीराव पेशवे यांच्याबरोबर त्यांची खास मैत्री जुळून आली. आपल्या पराक्रमाच्या जोरावर इसवी सन १७२९च्या सुमारास त्यांना माळवा प्रांताची सुभेदारी मिळवली.

मल्हारराव होळकर हे मूळचे महाराष्ट्रातील धनगर जमातीतील वीरपुरुष होते. ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मराठा साम्राज्याच्या माळवा- मध्यप्रदेश प्रांताचे पहिले सुभेदार होते. बाळाजी विश्वनाथ यांनी मराठ्यांचे उत्तर भारतात वर्चस्व प्रस्थापित करण्यात मोठा वाटा असलेल्या मल्हाररावांना इंदूर संस्थानाची जहागिरी दिली. मल्हारराव हे भटक्या धनगर मेंढपाळ कुटुंबातील होते. त्यांचे वडिल खंडोजी वीरकर चौगुला यांचा अशाच भटकंतीत पुणे जिल्ह्यातल्या बारामती तालुक्यातील होळ या गावी मुक्काम पडला होता. या गावी तांड्याचा मुक्काम असतानाच मल्हाररावांचा जन्म दि.१६ मार्च १६९३ रोजी झाला. ते लहान असतानाच खंडूजींचा मृत्यू झाला. ते व त्यांच्या आईवर भाऊबंदांचा जाच वाढू लागला, म्हणून दोघांनी सुलतानपूर परगण्यातील तळोदे येथे भोजराज बारगळ या मामाकडे आश्रय घेतला. होळ गावातील वास्तव्य संपले परंतु होळचे नाव त्यांच्यामागे कायमचे चिकटले. "मुलाचे पाय पाळण्यात दिसतात" या उक्तीप्रमाणेच छोटे मल्हारराव तांड्यातील मुलांबरोबर खेळताना आपले गुण दाखवू लागले. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभे केलेले स्वराज्य निष्ठेने वाढविण्याची जबादारी सुभेदार मल्हारराव होळकरांनी आपल्या खांद्यावर घेतली होती. मराठी साम्राज्य वाढविण्याच्या कामी मल्हारबांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि मराठी साम्राज्याच्या सीमा सिंधू नदीपर्यंत वाढविल्या. भोजराज मामांची मुलगी गौतमी हिच्याबरोबर मल्हाररावांचा विवाह झाला आणि त्यांना एक पुत्ररत्न जन्मास आले. त्यांचे नाव खंडेराव ठेवण्यात आले. जेजुरीच्या खंडेरायाच्या कृपादृष्टीमुळेच आपली प्रगती झाली असल्याची मल्हाररावांची धारणा होती, त्यामुळेच त्यांनी सुभेदारी मिळाल्याबरोबर जेजुरीला कुलोपाध्ये नेमले. मंदिराचे बांधकाम करण्याचा घाट घातला. उत्तरोत्तर मल्हाररावांची प्रगती होत होती. राणोजी शिंदे आणि उदाजी पवार यांच्यासोबत माळव्याची सुभेदारी समर्थपणे सांभाळीत होते. गनिमीकावा व मुत्सदेगीरीच्या जोरावर उत्तर भारतीय राजकारणामध्ये त्यांचा मोठा दबदबा झाला होता. इ.स.१७३३मध्ये चौंडीच्या माणकोजी शिंदे यांची कन्या अहिल्याबाई यांचेबरोबर पुत्र खंडेराव यांचा विवाह लावून देण्यात आला. दि.१७ मार्च १७५४मध्ये कुंभेरीच्या किल्ल्याला वेढा दिला असताना भर दुपारी खंडेराव छावणीतून बाहेर पडले, मात्र किल्ल्यावरून सोडलेल्या तोफेचा गोळा लागून त्यांना वीरमरण प्राप्त झाले. अहिल्याबाई सती जाण्यास निघाल्या असताना मल्हाररावांना तिचा विचार बदलण्यात यश आले, परंतु बाकी अकरा जणी सती गेल्या. पुत्रवियोगाचे दुःख पचवून मल्हाररावांनी मोहिमा उघडल्या. इ.स.१७५८मध्ये मराठ्यांनी अटकेपार झेंडे फडकाविले. यात त्यांना मल्हाररावांनी मदत केली. मात्र मोगल सरदार नजीबाने केलेल्या चुका त्यांनी अनेकदा पोटात घातल्या व त्याला मोकळे सोडून दिले. त्यांच्या याच कृतीने घात झाला आणि पुढे याच नजीबाने अब्दालीला बोलावून पानिपतचे युद्ध घडवून आणले. मल्हाररावांनी गनिमी काव्याने युद्ध करण्याचा सल्ला भाऊसाहेब पेशव्यांना देऊनसुद्धा त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे रणांगणात मराठ्यांना पराभव स्वीकारावा लागला.

मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे हे आरंभी जिवलग मित्र होते. उत्तर हिंदुस्तान या दोघांनी गाजवून सोडला. मोगल बादशहाचे सर्व सरदार, वजीर दोघांनाही टरकून असायचे. अब्दालीच्या तीन स्वाऱ्या झाल्यानंतर मराठेच आता बादशाहीचे रक्षण करू शकतील, एवढा विश्वास बादशहाच्या मनात निर्माण झाला होता. तिसऱ्या स्वारीनंतर त्याचे डोळे उघडले आणि त्याच्या सफदरजंग या वजीरामार्फत त्याने कनोज येथे होळकर-शिंदेंशी दिल्लीच्या तख्ताच्या रक्षणाचा करार केला. होळकर-शिंदेंनी जरी हा करार पेशव्यांचे प्रतिनिधी म्हणून केला असला, तरी या दोघांत प्रबळ सरदारांचे सामर्थ्य पाहूनच बादशहा हा करार करायला प्रेरित झाला होता. जयाजी शिंदेंचा बिजोसिंगने केलेला खून आणि कुंभेरच्या लढ्यात खंडेराव होळकरांचा झालेला अपघाती मृत्यू या प्रकरणांमुळे शिंदे-होळकरांत जरी वैमनस्य निर्माण झाले असले तरी मराठी साम्राज्याच्या हितासाठी त्यांनी शिंदेंशी पुन्हा मैत्री साधण्याचा अनेकदा प्रयत्न केला. शिंद्यांशी मैत्री होती तोवर पेशव्यांनाही आमची धास्ती होती, असे सार्थ उद्‌गार दत्ताजी शिंदेंनी त्यांची भेट नाकारल्यावर काढले. तरीही ते किल्मिष मनात न ठेवता मल्हाररावांनी बुराडी घाटावर दत्ताजी शिंदे हे झुंजत असताना तुकोजीराव होळकरांना त्यांच्या मदतीसाठी पाठवले होते. पानिपतच्या युद्धापूर्वीच दि.१३ मार्च १७६० रोजी मल्हाररावांनी अब्दालीशी तह करून त्याला परतही पाठवण्यास सुरुवात केली होती, परंतु तोवर भाऊसाहेब पेशवेच उत्तरेत यायला निघाल्याने नजीबाच्या आग्रहाने अब्दाली येथेच थांबला. दि.१४ जानेवारी १७६१ रोजी मल्हारराव होळकर ऐन वेळी रणमैदान सोडून गेले, असा त्यांच्यावर आक्षेप आहे. पण आता नव्या पुराव्यांच्या प्रकाशात संजय क्षीरसागर या संशोधकाने मल्हारराव सायंकाळी साडेपाचपर्यंत रणमैदानावरच झुंजत होते. त्यांनी आपला सरदार संताजी वाघ यास भाऊच्या मदतीसाठी ससैन्य पाठवले होते, हे सप्रमाण सिद्ध केले आहे. पराभवाचे शल्य मनामध्ये बोचत असतानाच आणखी एक दुःखद धक्का बसला. त्यांच्या पहिल्या पत्नी गौतमाबाई दि.२९ सप्टेबर १७६१ रोजी मृत्युमुखी पडल्या. त्यामुळे ते आणखीनच खचले. अहिल्याबाईंची राजकारणातील समज पाहून ते अनेकदा तिच्याशी सल्लामसलत करीत असत. स्वतः मोहिमेवर असताना दौलत आणि खाजगी या दोन्ही जबाबदाऱ्या अहिल्याबाईंनाच पार पाडाव्या लागत होत्या. पानिपतनंतर मराठेशाहीची बिघडलेली घडी पुन्हा बसविण्यात माधवराव पेशव्यांबरोबर मल्हाररावांनी पुढाकार घेतला आणि सलग मोहिमा आखून ते स्वतःला कार्यमग्न ठेवू लागले. अशाच एका मोहिमेवर असताना दि.२० मे १७६६ रोजी आलमपूर येथे मल्हारवांना मृत्यूने गाठले. आपल्या संपूर्ण हयातीत त्यांनी चार पेशव्यांच्या कारकिर्दी बघितल्या. पेशव्यांच्या घरात त्यांना वडीलकीचा मान होता. अहिल्यादेवींनी त्यांच्या पश्चात आलमपूरचे नाव बदलून मल्हारनगर ठेवले आणि तेथे त्यांची छत्री उभी केली.



# संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**संविधानाविषयी अत्यावश्यक माहिती जाणून घेतल्यानंतर, आता आपण त्याच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न करणार आहोत. संविधानाच्या अनुच्छेदांना एकेक करून समजून घेऊनच आपण त्याचे अंतरंग जाणू शकतो. आपणास पूर्व कल्पना आहेच की, आपल्या संविधानात '२५ भाग' '१२ अनुसुच्या' आणि '३९५ अनुच्छेद' आहेत. गरजेनुसार वेळोवेळी आपल्या राज्यघटनेत 'घटनादुरुस्त्या' होऊन या अनुच्छेदांची संख्या '४५०' च्याही वर पोहोचलेली आहे. परंतु हे वाढलेले अनुच्छेद '३९५' च्या पुढे न मांडता, आहे त्याच अनुच्छेदांमध्ये 'खंड, उपखंड' म्हणून मांडल्यामुळे आपल्या राज्यघटनेतील अनुच्छेदांची संख्या ही '३९५च' दिसते.**

**अनुच्छेद कसे समजून घ्यावे ?:** आता एक महत्त्वाची बाब लक्षात घ्या, की संविधानातील कोणतेही 'अनुच्छेद' समजून घ्यायचे असेल, तर त्याची एक रितसर पद्धत आहे. एखादे अनुच्छेद जाणून घेण्यासाठी सर्वात अगोदर त्याचे संविधानात असलेले 'मूळ वाक्य' वाचावे. त्याची संविधानातली मूळ 'कायदेशीर भाषा' काय आहे, ती आपण पहिल्यांदा बघायची असते. त्यानंतर त्या मुळ वाक्यात कोणकोणत्या 'तांत्रिक शब्दांचा', 'वाक्य प्रचारांचा' वा 'संज्ञांचा' वापर झालेला आहे, ते पहावे. त्यानंतर त्या वापरलेल्या शब्दांचा, वाक्यप्रचारांचा, संकल्पनांचा नेमका काय 'अर्थ' आहे, ते समजून घेणे गरजेचे असते. तेव्हाच त्या अनुच्छेदाचा 'भावार्थ' लक्षात येतो. त्यानंतर त्या अनुच्छेदाशी संबंधित काही 'घटनादुरुस्त्या' झालेल्या आहेत का ? त्या अनुच्छेदाशी संबंधित काही 'कायदे' पास करण्यात आलेले आहेत काय ? एखादी महत्त्वाची 'केस' त्या अनुच्छेदाशी संबंधित 'सुप्रीम कोर्टात' दाखल झाली होती का ? त्या केसचा निकाल देताना 'सुप्रीम कोर्टाने' त्या अनुच्छेदाचा काय 'अर्थ' लावलेला आहे ? स्वतंत्र भारतात संविधान लागू झाल्यानंतर त्या अनुच्छेदाशी संबंधित काही 'व्यवहारिक बाबी' घडलेल्या आहेत काय ? त्याच्याशी संबंधित घटनांमध्ये त्या अनुच्छेदाचा 'प्रयोग वा वापर' कशा प्रकारे झालेला आहे ?, ते देखील बघणे आवश्यक आहे. शिवाय काही इतरही महत्त्वाच्या बाबी या अनुच्छेदाशी संबंधित आहेत काय ?; अशा प्रकारे कोणतेही अनुच्छेद जाणून घेताना 'ह्या' काही मुद्द्यांनुसारच ते समजून घेणे गरजेचे असते.

आता सगळ्याच अनुच्छेदांच्या बाबतीत 'ह्या' सगळ्याच बाबी लागू होतील, असे नाही. परंतु तरीही कोणतेही 'अनुच्छेद' समजून घेताना, या सर्व बाबी डोळ्यांसमोर ठेवने गरजेचे आहे. आपल्या संविधानाची रचना अत्यंत सुसूत्रपणे करण्यात आलेली आहे. आपल्या संविधानाच्या २५ भागांपैकी 'पहिला भाग' हा "संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र" या शीर्षकाखाली संविधानात अंतर्भूत करण्यात आलेला आहे. 'भाग-एक' मध्ये 'अनुच्छेद-१ ते ४' अशा एकूण चार अनुच्छेदांचा समावेश आहे. ह्या चारही अनुच्छेदांविषयी वर नमुद केलेल्या अनुच्छेद समजून घेण्याच्या रितसर पद्धतीनुसार क्रमाक्रमाने आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करुया... **अनुच्छेद-१:- संघराज्याचे नाव व राज्यक्षेत्र.- खंड (१):- (१) इंडिया, अर्थात भारत, हा राज्यांचा संघ असेल. (२) राज्य व त्यांची राज्यक्षेत्रे पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.**



भाग-१०

**(३) भारताचे राज्यक्षेत्र --**
**(क) राज्यांची राज्यक्षेत्रे;**
**(ख) पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली संघ राज्यक्षेत्रे;**
**आणि (ग) संपादित केली जातील अशी अन्य राज्यक्षेत्रे, मिळून बनलेले असेल.** आपल्या राज्यघटनेची सुरुवातच आपल्या देशाचे अधिकृत नाव काय असेल, याविषयी स्पष्ट करत करण्यात आलेली आहे. 'अनुच्छेद-१' वाचल्यानंतर आपल्या लक्षात आलेच असेल की, हे 'अनुच्छेद-१' आपल्या देशाच्या नावाविषयी तसेच भारताचे 'घटकराज्ये' आणि 'राज्य क्षेत्रांविषयी' माहिती देते. दोन महत्त्वाच्या बाबींविषयी 'अनुच्छेद-१' आपल्याला माहिती देते... पहिली म्हणजे, आपल्या देशाचे 'अधिकृत नाव' काय आहे ? या प्रश्नाचे उत्तर देताना राज्यघटना स्पष्टपणे सांगते की, आपल्या देशाचे अधिकृत नाव 'इंडिया' अर्थात 'भारत' असे आहे. म्हणजेच आपल्या देशाचे नाव इंग्रजी भाषेत 'इंडीया', तर इंग्रजी व्यतिरिक्त अन्य इतर सर्व भाषांमध्ये केवळ आणि केवळ 'भारत' हेच 'अधिकृत आणि संविधानिक' नाव आहे. याचा स्पष्टपणे अर्थ असा आहे की, याव्यतिरिक्त अन्य इतर कोणतेही नाव हे आपल्या देशाचे 'घटनात्मक नाव' नसेल. यातून खुप मोठा संदेश आपल्या घटनाकारांनी आम्हा सर्व भारतीयांना दिलेला आहे. याचा स्पष्टपणे अर्थ असा होतो की, हा देश इथे राहणाऱ्या सर्व जाती-धर्मांच्या लोकांचा आहे. प्रत्येक भारतीयाचा आहे.

आणि या अनुच्छेद-१ मध्ये नमूद दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, कोणत्या प्रकारची 'राज्यपद्धती' हे संविधान लागू झाल्यानंतर आपल्या देशात असेल ? आपल्या देशात जे घटक राज्ये आहेत, ते कशाप्रकारे भारतात सहभागी झालेले आहेत ? अर्थातच, यासाठी वेगवेगळ्या शब्दांचा वापर केला जातो. परंतु आपल्या राज्यघटनेत यासाठी 'राज्यांचा संघ (Union Of State)' हा शब्द वापरण्यात आलेला आहे. याचा साधा अर्थ आहे की, आपल्या देशाचे जे 'घटकराज्ये' आहेत, ते कोणत्याही करारानुसार भारतात सहभागी झालेले नाहीत; त्यामुळे ते भारतापासून अलग होऊ शकत नाही. म्हणजेच 'भारत' हा अविभाज्य 'संघराज्य' आहे. भारतात कोणकोणते राज्य सहभागी होतील, याबाबतची यादी 'पहिल्या अनुसूचित' देण्यात आलेली आहे. ज्यात सध्या २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेशांच्या नावांचा समावेश आहे.

# झिमझिम सुखाचा पाऊस



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**किती वेळ अशी खिडकीत उभी आहे मी! उगीच रस्ताकडं बघत. अंगणातील ती सायलीची वेल आतापर्यंत कितीवेळ मी निरखून पाहिली असेल? कीती वाजले ते पहायला माजघरातं जावं का? नको बाई! मी घड्याळ पाहिलं तर अजून बराच काळ लोटायचा आहे याची कल्पना होईल आणि मग पुढची वेळ काढणं किती कठीण जाईल. ते भितींवरलं घड्याळही डोळे मिचकवत म्हणेल, 'असं सारखं सारखं मला पहात बसली म्हणजे काय वेळ तीन वरून सहा वर उडी घेणार नाही. तू खुशाल माजघरात येरझाऱ्या घाल. ललित काय सहावाजल्यावाचून घरी..'अगं बाई, त्याचं नाव घेतलं मी. एकदा त्याच्या हट्टापायी मी कुशीत तोंड लपवून कधीतरी घेतलही असेल, पण असं ते नसताना असं भर दिवसा.....**

हल्ली हे पहिल्यासारखं मुळीच राहत नाही. कामाचा व्याप एवढा वाढला की पूर्वीसारखं जरावेळ त्याची थट्टा करत बसावं. त्याच्या कुशीत डोकं ठेवून पडावं पण......काल आईचा फोन येऊन गेला तेव्हापासून जरा जास्तचं शांत झालेत हे. त्याच्यासाठी आज मुद्दाम केळ फुलाची भाजी बनवली होती. त्यांना फार आवडते. पण आज त्यांनी ती तोंडपाडून खाल्ली. आणि बिछान्यावर पडले. स्वयंपाकघरातील सारी कामे आटपून मी ही पडले. बाहेर मध्यरात्र झाली होती. रस्तावरल्या दिव्याचा प्रकाश तेवढा खिडकीच्या फाटीतून आत पडत होता. आज झोप माझ्यावर रागवून कुठे गेली होती कुणास ठाऊक. डोळे बंद केले पण मनाच्या पाकळ्या मिटेनातच, शेवटी तशीच मी स्वस्थ पडून राहिले. मात्र एकसारखं घोकीतच होतं, 'आज इकडलं मन इतकं अस्वस्थ कसं झालं ? आणि घरी यायला इतका उशीर का झाला त्यांना ? सासूबाई काय म्हणाल्या असतील त्यांना. पुन्हा काही पैशाची मागणी तर नसेल ना केली. मागीलवेळी यांनी कामाचे सगळे पैसे त्यांच्या औषधासाठी दिले. फक्त परतण्याचेच पैसे जवळ ठेवले. पण फक्त मामेसासऱ्यांच्या मुलांला खाऊचे पैसे नाही ठेवले म्हणून तीळाचा डोंगर केला सासूबाईनी. त्यांच पायाचं दुखणं जसं वाढलं तशी त्यांची फिरण्याची इच्छा जास्तीच दुणावली. एरवी घरात बसून असायच्या त्यांना हवं नको ते मी सारं पहायचे. कुठल्याही कामाला शिवू देत नव्हते. पण त्यांच्या भावाकडे गेल्यापासून स्वतःची कामे स्वतःच करतात त्या वर इकडे म्हणायचं झालं तर पुन्हा माझे किती दिवस राहिलेत तरी म्हणून सगळ्याकडे काही दिवस राहून घेते म्हणतात. त्यांच्या या हट्टापायी त्यांनी दुखणे वाढवून घेतले. आणि वर यांची अडचण. महिन्याचा पगार सासूबाईच्या खर्चासाठी जातो. त्यातील काही पैसे हे माझ्या हातात देतात त्यातूनच मी घरखर्च भागवते. आमच्या लग्नाला चार वर्ष झालीत. पण एवढ्या वर्षात यांनी मला कोणत्याही गोष्टीची कमी पडू दिली नाही. घरात एकावेळेच जेवण बनलं तर खुशाल मला भरवता. मी मात्र जेवून आलो आहे ! पोटात कणभरही जागा नाही असं सांगतात. पण मी कुठं त्याचं ऐकते. एक भाकरी ही त्यांच्यासोबत मी अर्धे अर्धे वाटून खाते. तेव्हा प्रेमाने मला घास भरवायचे. तेव्हा लाजून मी त्यांना म्हणायचे. 'इश्श ! काहीतरीच काय तुमचं, कुणी पाहिलं तर काय म्हणेल ? तेव्हा मोठ्या आनंदाने ते म्हणतं इथे आपल्याशिवाय दुसरे कोणीही नाही आणि जरं दारातून कोणी पाहिलेच तरं म्हणेल आपल्या लाडक्या बायकोला हा नवरा मोठ्या प्रेमाने घास भरवतं आहे.' पण हल्ली त्याच्या चेहऱ्यावरील तो आनंद.....

पावलं वाजल्यासारखी वाटली. मी हळूच डोळे उघडून पाहिलं तिकडून उठलं झालं होतं. पाणी प्यायला स्वारी उठली असावी. पण ते माजघरातील आरामखूर्चीत जाऊन पडले होते. मी त्यांच्याजवळ गेले तेव्हा जरा चमकले पण न रहावल्याने मी त्यांची समाधी मोडली आणि काही हवं का तुम्हांला विचारलं ? माझा हात हातात घेत त्यांनी जवळ बसवलं. मोठे दुःखी आणि कष्टी दिसतं होते ते, माझी छाती धडधडू लागली. आजपर्यंत त्यांना एवढं दुःखी कष्टी मी पाहिलेलंच नव्हतं. सासूबाईच्या फोन विषयी विचारावं का ? नको पुन्हा जर त्रासले तर, न राहून मी विचारले. हल्ली झोप रागावलेली दिसते. तुम्ही फार वेळ कामाचा त्रास नका घेत जाऊ. आपली प्रकृती ही पहायला हवी. आजारी झालात तर ? 'तर तू कशाला आहेस, तू असताना मला बरे काही होईल. 'तुमचं आपलं काहीतरीचं...पाणीपतचं युद्ध केव्हाचं संपलय बरं, तेव्हा नव्या योजना कामी पडणार नाही. 'मैदानी युद्ध बरी असतात गं! किमान जखमेचे ओरखडे तरी दिसतात पण मनाचे युद्ध तसे फार भयंकर. जखमा होतात पण व्रण दिसत नाही.' असं काय हे बोलून गेले मला त्याचा काही अर्थच लागेना. मनाचे युद्ध! नेमकं काय चाललंय त्याच्या मनात याची मोठी काळजी लागली मला. माझ्या पडलेल्या मुद्रेकडे त्यांच लक्ष गेलं असावं. मला ना बोलती पाहून तेच बोलले. 'कवी मी तुझा गुन्हेगार आहे गं! लग्नानंतर तू काय म्हणून तू एक गोष्ट मला मागीतली आणि ती आजपर्यंत मी तुला देऊ शकलो नाही. किती साधी होती तुझी इच्छा! मला चांदणं आवडतं हे पहिल्या भेटीत तुला कळालं. 'दर पौर्णिमेला आपणं टेकडीवर जाऊ. तेथून चांदणं किती छान दिसतं असं तू म्हणालीस. पण गेली चार वर्षात मी तुला एकदाही बाहेर फिरायला घेऊन गेलो नाही. मी कामावर गेल्यानंतर तू घरातील सगळी कामे आटपून घरात रेगांळत बसायची. संध्याकाळी मी लवकर येणार या खुशीत



स्वयंपाक करून ठेवायचीस. जेवण आटोपल्यावर थोड्यावेळ तुझ्याशी बोलायचो ते ही कामाचा पसारा काढतं. सासूचं दुखणं सांभाळत. तू घर चालवलं माझ्या कामाचा ताण वाढू लागला तसंतसं तुझ्यासोबत वेळ घालवणे मागे पडलं. हळूहळू सारी स्वप्न विरघळून जावू लागली. तुला सोनचाफ्याची फुलं आवडतातं हे ही मला पहिल्या भेटीत कळालं. त्या लग्नांच्या पहिल्या रात्रीत मी स्वतःशीच म्हणालो, मी एक नोकर आहे. कवीतेची दागिन्याची हौस भागवू शकलो नाही तरी चालेलं पण तिला अधून मधूनमधून सोनचाफ्यांची फुलं वेणी आणून देईल. कवीता आपल्या दोघांच्या इच्छा किती साध्या होत्या! पण त्या....'

लग्न झाल्यापासून तुला मी सुखात ठेऊ शकलो नाही!

त्यांना कसं गप्प बसवावं, ते मला कळेना. जखमेची खपली काढून ती बारी होते ? मनातं आलं मला फुलं नकोत, फिरणं नको, दुसरं काही नको..अशा काळोखात दगडाच्या शय्येवरही मोठ्या आनंदानं झोपेन, झोपतेच आहे. मात्र एक गोष्ट मला हवी. तुम्ही-तुमची थट्टा, तुमचं हसणं, तुमचा स्पर्श, तुमचं गाणं-'

मनाला किती अडसर लावलेले असतात जे मनात ते जिभेवर उतरलं नाही. मात्र मी त्यांच्या खांद्यवर डोकं ठेवलं आणि त्यांच्याकडे पाहतं म्हणाले,'असं काहीतरी काय बोलायचं सुखात आहे मी तुमच्यासोबत. दुपारपासून ज्या गोष्टीसाठु त्याची वाट पाहत होते ती गोष्ट त्यांना सांगावी का ? पण ते आधीच काळीजत आहे. पण ही गमंत ऐकताच त्यांची काळजी कुठल्या कुठं उडून जाईल. त्यांच्या कुशीत शिरून मी त्यांना म्हटलं. आपलं सर्वांत मोठं स्वप्न कुठलं होतं ? ते खरं होणार आहे. मला कुशीतून वेगळं करत ते माझ्याकडे चमकून पाहून लागले. त्याच्या ओठांवर एक स्मित लकेर ओढली होती. हळूच लाजत मी मान खाली घातली. आणि म्हणाले, आता सोनचाफ्याची गरज नाही. आपले आयुष्य सुगंधित करणारं कोणीतरी येणार आहे!' हे ऐकताच त्यांना केवढा आनंद झाला. मोठ्या खुशीनं त्यांनी मला जवळ ओढलं. त्याच्या स्पर्शात प्रेम होतं, कारूण्य होतं. ओठांवर हासू आणि डोळ्यात पाणी ही नाचतं होतं. 'कविते तू मला जगातील सर्वोच्च आनंद दिला आहेस. माझ्या जीवनातील हा सर्वाधिक सुखाचा क्षण आहे. मी आईला फोन करून कळवतो. ही बातमी ऐकताचा ती पायाचं दुःखणं टाकून पळत येईल बघ! लगबगीनं ते फोनकडे गेले मी त्यांच्या आनंदी मुद्रेकडे तशीच पाहतं बसले. किती आनंदात होते ते. मघाशी. मोठ्या क्रूर युद्धाच्या गोष्टी करणारे हेच आहेत. असं कोणी सांगितलं असतं तरी मला पटलं नसतं. बाबा होणार या आनंदानं त्यांच लहान मुलं झालं होतं. कामाचा सगळा ताण विरघळून गेला होता. आई, मामा, यांना मोठ्या प्रेमाने ते ही बातमी कळवतं होते. आई सकाळच्याच गाडीने परतणार होत्या. मला घरातील कामाला हात लावू देऊ नको असं मोठ्या प्रेमाने त्यांनी सांगितलं. जगात देव असतो. आणि तो प्रत्येक क्षणी आपल्या सोबतचं असतो. दुःखाचा झळ्या बसायला लागल्या की हो सुखाचा पाऊस अंगावर टाकतं असतो. अशाच सुखात आम्ही दोघं आज भिजतं होतो.

# चंदन आणि संत

आधुनिक केसरी

भगवान राईतकर (गोभणीकर)
विवेकानंद नगर, मेहकर
मो.9730332151

संत साहित्यामध्ये संतांचे वर्णन करण्यासाठी शास्त्रांनी आणि संतांनी साधूंना चंदनाची उपमा दिलेली आहे. एका अभंगामध्ये जगद्गुरु संत तुकाराम महाराज म्हणतात की," तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी | तैसे तुम्ही जगी संतजन ||" . संत आणि चंदन यांच्यातील गुणात्मक साम्य संत साहित्यामध्ये सांगितले आहे. चंदन आणि संत यांच्यामधील साम्य पाहूया ! १ ) चंदनाचे झाड ज्या ठिकाणी असेल, त्या ठिकाणचा संपूर्ण परिसर सुगंधी असतो. त्याचप्रमाणे, संतांचे वास्तव्य ज्या ठिकाणी असते, त्या ठिकाणी संपूर्ण वातावरण मंगलमय असते.२ ) चंदनाचे झाड ज्या ठिकाणी असेल, त्या ठिकाणी त्याच्या आजूबाजूला असलेले सर्व झाडे चंदनासारखी सुगंधी होतात. त्याचप्रमाणे, संताच्या सानिध्यामध्ये येणारा साधक जीव हे संत बनतात.३ ) चंदन हे ताप निवारक आहे. ताप आल्यास अंगास आणि कपाळास चंदन लावतात. त्याचप्रमाणे, संतांमुळे त्रिविध ताप क्षणात नाहीसे होतात. ४ ) चंदन हा दुर्लभ आहे. त्याचप्रमाणे संत किंवा साधू दुर्लभ आहेत. ते सर्वत्र नसतात.५ ) चंदन आपले गुण देतो. परंतु, दुसऱ्याचे दुर्गुण घेत नाही. त्याचप्रमाणे, संत आपले सद्गुण देतात. पण, दुसऱ्याचे दुर्गुण घेत नाहीत.६ ) चंदन हा निरपेक्ष मोठा आहे. त्याचप्रमाणे, संत हे निरपेक्ष मोठे असतात.७ ) चंदन जसा झिजतो व आपला सुगंध सर्वांना देत असतो. त्याचप्रमाणे, संत हे जगाकरिता झिजतात व जगाचे कल्याण करतात. अशाप्रकारे चंदन आणि संत यांच्यामध्ये सात साम्य सद्गुण पहावयास मिळतात.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रवाद आणि विद्यमान राज्यकर्त्यांचा बेगडी राष्ट्रवाद..!

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : १७

***मित्रांनो..! सावध व्हा. विद्यमान सत्ताधारी संविधानाला धक्का न लावताच संविधान संपवित आहेत... आणि आमचे संविधानवादी म्हणताहेत "संविधानाला धक्का लावून तर बघा..!" बंधुंनो ते संविधानाला धक्का न लावताच खाजगीकरण करताहेत. खाजगीकरण करून आरक्षण संपवून टाकताहेत आणि आरक्षणाच्या मुद्द्यावरच जातीजातीत भांडणे लावत आहेत. अशी आपली सर्रास दिशाभूल सुरू आहे. देशातली संपत्ती स्वतःचीच समजून ते विकून टाकताहेत. राष्ट्रीय कंपन्यांचे, शिक्षणासोबत अनेक क्षेत्राचे, अनेक महामंडळांचे खाजगीकरण करताहेत. खाजगीकरण केल्यावर गरीब माणूस शिकणार नाही, नोकरीला लागणार नाही.. आणि महागाईने त्याचे जगणे मुश्किल होईल. अशी परिस्थिती निर्माण करत आहेत. सध्या ही सुरुवात झालेली आहे. अनेक जीवनावश्यक गोष्टी महाग करून लोकांना त्रस्त करण्याचे मनसुबे सुरू आहेत. लोकांचे जीवन विस्कळीत करत आहेत. लोकतंत्राचा गैरवापर करून देशासोबत बेईमानी करत आहेत आणि पुन्हा खोट्या जाहिराती करत आहेत, खोट्या, बेगडी राष्ट्रवादाचा आव आणत आहेत. ही विद्यमान राज्यकर्त्यांची बेगडी राष्ट्रवादाची राजनीति लोकांनी समजून घेतली पाहिजे.*** आजच्या सर्व खोटारड्या, भ्रष्ट राजकारण्यांचा खोटा राष्ट्रवाद एकीकडे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्या एकाच व्यक्तीचा खरा राष्ट्रवाद एकिकडे... याबाबत विचार करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रवाद आणि विद्यमान राज्यकर्त्यांचा बेगडी राष्ट्रवाद या दोन्हींमध्ये खरा राष्ट्रवाद आणि बेगडी राष्ट्रवाद अशी एक कमालीची तफावत दिसून येते. माझ्यामते अलिकडे सत्तारूढ असलेल्या राजकर्त्यांच्या राष्ट्रवादाची जी संकल्पना आहे ती अत्यंत बेगडी आहे, तर याऊलट डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रवाद हा त्यांच्या एकुणच महान कार्यातून खरा राष्ट्रवाद दिसून येतो.

वर्तमानात राजकारणाची बदललेली सामाजिक, राजकीय, धार्मिक व जातीय समीकरणे तसेच सत्तारूढ राज्यकर्त्यांचा जनतेविषयीचा खोटा कळवळा, जनतेची केली जाणारी दिशाभूल आणि मतांचे राजकारण याविषयी जनतेने विद्यमान राज्यकारणाकडे चिकित्सक दृष्टीने बघणे गरजेचे ठरले आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादाविषयीची भूमिका आणि विद्यमान सत्ताधारी राज्यकर्त्यांची भूमिका यामधील तफावत समजून घेऊ. भारतरत्न, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादाची कल्पना ही शोषणमुक्त राष्ट्राची होती. धर्मनिरपेक्ष राष्ट्राची होती. बाबासाहेबांच्या कल्पनेतील भारत हा समतावादी असला पाहिजे. जातीयवादमुक्त असला पाहिजे. गरीबीमुक्त भारत. अंधश्रद्धामुक्त भारत. स्त्री- पुरुष समानता असणारा भारत. समाजात बंधुभाव असणारा भारत. सत्याला न्याय देणारा भारत. सर्वांना समान हक्क देणारा भारत. प्रज्ञावंत समाज असणारा भारत, शीलवंत समाज असणारा भारत. दुःखी कष्टी जीवांवर करुणा दाखवणारा....आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेला भारत. कृषिप्रधान असणारा सधन भारत. शैक्षणिकदृष्ट्या उच्चस्तर असलेला भारत. अखंड भारत. वैज्ञानिक क्रांती करणारा भारत. प्रत्येक क्षेत्रात इतर राष्ट्राच्या पुढे असणारा भारत. अशा अनेक संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात होत्या... एवढेच नाही, तर ह्या सर्व संकल्पना सत्यात उतरविण्यासाठी त्यांनी घटनेत तसे नियम व कायदे करून ठेवले होते व त्यांनीच सांगून ठेवले होते की, आपल्या भारताची ही राज्यघटना सर्वश्रेष्ठ आहे; मात्र या राज्यघटनेचा अंमल करणारे जर चांगले नसतील, तर त्यांच्यासाठी हे केवळ एक पुस्तक आहे आणि नेमके तेच झाले. एका वर्गाकडून ही सर्वोच्च घटना जाळण्याचाही प्रयत्न केला गेला. अलिकडे तर संविधान बदलण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्राऐवजी हिंदुराष्ट्र करण्याचे कारस्थान सुरू आहे. भारतात सध्याची सामाजिक स्थिती भौतिक साधनांच्या अतिरेकी वापराने अत्यंत अलबेल असताना दिसत असली, तरी ती तशी नाही, ती अत्यंत दयनीय आहे. भारतात सध्या लोकशाहीच्या आडून हुकुमशाहीचं राज्य आहे. राजकारण आणि समाजकारण यांचा ताळमेळ बसताना दिसत नाही. भारतीय समाजव्यवस्थेत अराजकता निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. अलिकडे वाढीस लागलेली विशिष्ट समुहाची धर्मांधता ही सामाजिक विषमतेला खतपाणी घालणारी आहे. सामाजिक विषमता देशातील समाजव्यवस्था खिळखिळ करणारी आहे. समाजव्यवस्था जर खिळखिळ झाली तर देश कमकुवत होत जाईल आणि देश कमकुवत झाला तर आपल्या देशावर बाहेरील देश आक्रमण करतील. म्हणून देशाच्या सुरक्षिततेसाठी एकमेकांना पूरक असलेले देशाचे राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण हे तिनही घटक देशाची सुव्यवस्था राखण्यास कारणीभूत ठरतात. देशाच्या सुव्यवस्थेवर राष्ट्राचा विकास अवलंबून असतो. देशाचा कायदा आणि सुव्यवस्था राष्ट्राला मजबूत ठेवण्यास महत्वाची भूमिका बजावत असतात.



देशाचा कायदा हा समाजकारणावर, राजकारणावर आणि अर्थकारणावर अंकुश ठेवत असतो; यामुळे राष्ट्रात सुखशांती नांदत असते... म्हणूनच राष्ट्र मजबूत आणि सुखी राहण्यासाठी लोकशाहीच्या घटनातंत्राचा वापर झाला पाहिजे त्याशिवाय राष्ट्र मजबूत राहणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय राज्यघटनेला जगात तोड नाही.. एवढी ती परिपूर्ण आहे. भारतीय घटनेत मुद्दाम नोंदवलेली स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय' ही भारतीय लोकशाहीची मूल्ये देशाचे सामाजिक स्वास्थ्य राखण्यासाठी खूप मोलाची भूमिका बजावतात; परंतु ती मूल्ये रूजू द्यावयाची की, नाही हे राज्यकर्त्यांच्या नैतिकतेवर व राजनीतीवर अवलंबून आहे.

राज्यकर्त्यांच्या शासनप्रणालीखाली संपूर्ण देशाची सूत्रे हलत असतात. शासनकर्त्यांनी देशाच्या जनतेला जी वागणूक द्यावयाची असते ती देशाच्या संवैधानिक मूल्यांच्या नियमांचे पालन करूनच द्यावयाची असते.

राज्यकर्त्यांनी देशातील जनतेचे हित लक्षात घेतले पाहिजे. जनता सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या सुखी, समाधानी आणि सुरक्षित असल्याशिवाय राष्ट्र सुखी,समाधानी आणि सुरक्षित असणार नाही. हा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सद्सद्विवेकबुद्धीमध्ये असल्यामुळेंच त्यांनी लिहिलेल्या घटनेत तो उतरला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादाविषयीच्या भूमिकेत पारदर्शीपणा व दूरदर्शीपणा होता. कारण भारतीय समाजव्यवस्थेचा बाबासाहेबांनी सांगोपांग अभ्यास केला होता. भारतीय समाजव्यवस्थेत असणारी जाती- जातींची उतरंड आणि या उतरंडीमुळे समाजात असणारी वर्णभेदाची आणि वर्गभेदाची तफावत आणि याच तफावतीमुळे समाजव्यवस्थेत निर्माण झालेला जातीभेदाचा व वर्णभेदाचा कळस. यात असलेली स्पृश्य- अस्पृश्यता यातून निर्माण झालेली सामाजिक विषमता ही राष्ट्राच्या हितासाठी बाधक ठरत होती. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लक्षात आले होते. म्हणून भारतातील एकुणच समाज रचनेत समता निर्माण व्हावी. उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य हे भेद कायमचे नष्ट व्हावेत म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत समता,स्वातंत्र्य, बंधुता, न्याय ही मूल्ये मुद्दाम समाविष्ट केलेली आहेत. राज्यघटनेची ही जी मूल्ये आहेत ती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी इथल्या अठरापगड जातींना लक्षात घेऊनच नोंदवलेली आहेत. सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत राहून, एकमेकांत मिसळून स्वाभिमानाने जगता यावे. यातूनच विषमता नष्ट होईल. समाजातील स्पृश्य-अस्पृश्य हे भेद नष्ट होतील आणि एकसंध राष्ट्र निर्माण होईल हा दूरदृष्टीकोन बाबासाहेबांचा होता.

१९४७ च्या नंतर अर्थात स्वातंत्र्योत्तर कालखंडात राज्यघटनेतील कायद्यांनुसार समाजव्यवस्था बदलू लागली. अस्पृश्यता कमी होऊ लागली. स्वातंत्र्यानंतर ३० वर्षाचा कालावधी लोटला. पुन्हा भारतीय राजकारण्यांनी राजकीय स्वार्थासाठी धर्माचे आणि जातीचे राजकारण सुरू केले. "फोडा आणि राज्य करा" हया इंग्रजांच्या नीतीचा अवलंब करीत निवडून येण्यासाठी जातीबद्दलची, धर्मांबद्दलची खोटी अस्मिता दाखवून निवडणूका लढल्या जाऊ लागल्या. राजकीय मंडळी जातीय समिकरणातून आपापली पोळी भाजू लागले. जातीयवाद पुन्हा दृढ होऊन रुपांतरित झाला. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रप्रेमाची भावना कमी होऊन राष्ट्रप्रेमाऐवजी राजकीय मंडळी स्वतःवर प्रेम करू लागली. स्वतःच्या जातीचा पक्ष काढू लागली. राष्ट्रावरचे प्रेम स्वतःच्या पक्षावर करू लागली. जाती जातीचे पक्ष निर्माण झाले. धर्माचे पक्ष निर्माण झाले. राष्ट्राप्रती असलेले प्रेम पक्षावर रुपांतरित झाले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात जाती पातीचे अनेक पक्ष निर्माण झाल्यामुळें जनता जाती जातीच्या पक्षात विभागली गेली. प्रत्येक जातीचा पक्षाचा नेता एकाच कैवार घेऊ लागला. म्हणून राष्ट्रप्रेमाऐवजी अलिकडे पक्षप्रेम जवळचे वाटू लागले. अलीकडे पक्षावर असलेले प्रेम केवळ निवडून येऊन जनतेवर राज्य करण्यासाठी होते. पक्षावरचे खोटे प्रेम अलिकडे उघडे पडू लागले. आपण ज्या पक्षात काम करतो त्या पक्षावरच जर खोटे प्रेम असेल तर राष्ट्रप्रेम तर खोटेच असणार आणि मग राष्ट्रवाद तर खूपच दूरची गोष्ट आहे. अलीकडील राजकारणात राष्ट्रवादाची जागा पक्षवादाने, स्वार्थवादाने, धर्मवादाने आणि जातीयवादाने घेतली. याही पलीकडे जाऊन धर्म आणि जात तोंडी लावून जनतेचा वापर केवळ मतदानापुरता झाला. मतदानासाठी जाती जातीत, धर्माधर्मात तेढ निर्माण करण्याचे वेगवेगळे मनसुबे रचले जात आहेत. एवढेच नव्हे; तर जातीय दंगली घडवून आणणारे राजकीय नेते राष्ट्रप्रेमाची भाषा किंवा राष्ट्रवादाची भाषा विसरून गेले आहेत. म्हणून सत्तारूढ पक्षांनी भारतातील जनतेच्या तोंडी लावलेला राष्ट्रवाद हा बेगडी आहे. अलिकडे सत्ताधारी पक्ष तर धर्माला पुढे करून, देवाला पुढे करून महापुरुषांना पुढे करून राष्ट्रावर प्रेम असल्याचे दाखवत आहेत. त्यांचे ते खोटे प्रेम जनतेच्या लक्षात आले आहे. त्यांचा निवडून येण्यासाठीचा खोटा राष्ट्रवाद उघडा पडला आहे.

विद्यमान राज्यकर्त्यांनी जनतेच्या हिताचे कोणतेच निर्णय घेतलेले नाहीत. जनतेला महागाईच्या दरीत ढकलून दिले आहे. सत्तेच्या स्वार्थासाठी सत्तारूढ आणि विरोधी पक्षातील किळसवाण्या कलहाने उच्छाद मांडला आहे. राष्ट्रांतर्गत होणाऱ्या कलहामुळे प्रत्येक माणूस उद्विग्न झालेला आहे. राजकारणी व भांडवलदारांव्यतिरिक्त कोणताच समाज या देशात सुखी नाही. सत्तारूढ पक्ष जनतेला खूप कांही दिल्याच्या खोट्या जाहिराती करत आहे. सत्तारूढ राज्यकर्त्यांचा राष्ट्रवाद हा कमालीचा खोटा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत जे कायदे केले आहेत ते केवळ जनतेच्या हिताचे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समाजात जन्मल्यामुळे त्यांच्या वाट्याला आलेला संघर्ष त्यांनी स्वतः भोगला, अनुभवला आहे; म्हणून त्यांनी आपले आयुष्य केवळ समाजाच्या हितासाठीच खर्ची घालून इथल्या भयंकर अशा धर्मवादी, जातीयवादी, विषमतावादी,मनुवादी व्यवस्थेला वेगवेगळ्या ढंगाने जेरीस आणून कितीतरी कोटी जनतेला माणूस म्हणून जगण्याचा हक्क निर्माण करून दिला. धर्माच्या ठेकेदारांची ठेकेदारी मोडकळीस आणली. माणूस म्हणून जगण्याचे, आपापल्या धर्माप्रमाणे वागण्याचे,बोलण्याचे,संस्काराचे स्वातंत्र्य, प्रत्येकाला दिले जावे, असा विचार करून जनतेला केंद्रस्थानी ठेऊनच बाबासाहेबांनी भारताची राज्यघटना लिहिली. विदेशी आक्रमणाच्या शोषणापेक्षा भारतीय समाजव्यवस्थेतील विषमतेने जनतेचे केलेले शोषण थांबले असेल ते केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारामुळे.. हीच राज्यघटना जर एखाद्या मनुवादी विचाराच्या माणसाने लिहिली असती तर त्याने एकाच जातीला, धर्माला प्राधान्य दिले असते. पुन्हा राज्यघटनेऐवजी दुसरी मनुस्मृति लिहिली गेली असती आणि इतर सर्व जातीधर्मातील लोकांवर अन्याय करणारे कायदे लिहिले गेले असते. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ठायी असलेला उदारमतवादी स्वभाव,आणि भारतातील संपूर्ण जातीधर्मातील जनतेविषयी असलेला कळवळा, त्यांचे राष्ट्राविषयी असलेले निस्सिम प्रेम, त्यांनी सर्व जातीधर्मातील स्त्री- पुरुषांच्या हक्काची आणि स्वातंत्र्याची राज्यघटनेतून घेतलेली दखल हाच बाबासाहेबांचा खरा राष्ट्रवाद आपल्याला दिसून येतो. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रवाद आणि विद्यमान सत्ताधारी राज्यकर्त्यांचा राष्ट्रवाद यामध्ये कमालीची तफावत असल्याचे दिसून येते. विद्यमान राज्यकर्त्यांचा बेगडी राष्ट्रवाद देशासाठी आणि देशातील जनतेसाठी अत्यंत घातक आहे. म्हणून भारतातील जनतेने मतदानातूनच राज्यकर्त्यांना त्यांची जागा दाखवून दिली पाहिजे.

# शिक्षणाची वेळ चुकली तर आयुष्याची दिशा चुकते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**अवेळी आलेल शाहणपण उपयोगी ठरत नाही. शाहणपण हे वेळीच आलं पाहिजे तर ते उपयोगी ठरत .शिक्षणाची वेळ चुकवु नका शिक्षणाची वेळ चुकली तर आयुष्याची दिशा चुकते. विद्यार्थी दशेतील अमुल्य वेळ सत्कारणी लावा. आयुष्याचा पुर्वाध हा खुप महत्वाचा असतो याच कालखंडात आपण ज्या पद्धतीने मेहनत करतो त्यानुसार उर्वरित आयुष्याच भविष्य ठरत . मुळात शिक्षण हेच जीवन परिवर्तनाच माध्यम तर आहेच पण ते वाघिणीचे दुध पण आहे. शिक्षणाची सगळी साधनं प्रचंड प्रमाणात उपलब्ध असुन सर्व प्रकारच्या शैक्षणिक सेवा सुविधा देखील उपलब्ध आहेत.**

अस सगळं पूरक वातावरण असताना मुलांनी आपल्या जीवनाचं कल्याण करून घेण्यासाठी शिक्षणाचा योग्य वेळी योग्य पद्धतीने उपयोग करून घेतला पाहिजे.जेणेकरून उर्वरित आयुष्य आपल्याला पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. आयुष्यात वेळ हि खुप महत्वाची असते. भविष्य सुरक्षित सुकर होण्यासाठी वेळेचा योग्य आणि सटीक उपयोग करून घेता आला पाहिजे .याचं वेळेवर आयुष्यच गणित ठरत असतं . भविष्य निश्चित करणारी अनमोल वेळ हि वेळ व्यर्थ घालवता कामा नये. जीवनातील शिक्षणाचं अनमोल महत्त्व पाहता वेळ साधता आली पाहिजे .वेळ साधली तर जीवन साधलं पण सध्या ज्या पद्धतीने तरूणांची मानसिकता तयार होत आहे. त्या मध्ये शिक्षणा कडे औपचारिकता म्हणून पाहण्याचा मुलांचा दृष्टीने कोण वाढत चालला आहे.आई वडील पालक सांगतात म्हणून शाळेत जायचं अगदी तगादा लावतात म्हणून बळच अभ्यास करायचाय मुलांचा स्वतःचा रस अभ्यासात कमी झाला आहे.हे कटु सत्य आहे.मुळात मुलांची स्वइच्छेने अभ्यास करण्याची मानसिकता लोप पावत चालली आहे.आपवादत्मक मुलं सोडता इतर मुलांना यश पाहिजे पण मेहनत संघर्ष नको आहे . अभ्यास नको आहे.हे सर्व साधारण पणे सगळीकडे असणार चित्र आहे .अपवादात्मक काही मुल अहोरात्र अभ्यास करतात हे पण वास्तव आहे.आणि त्यांचं भवितव्य उज्ज्वल नक्कीच झाल्याशिवाय राहणार नाही पण बाकी उर्वरित जे आहेत त्यांचं काय ज्यांच्या दृष्टीने वेळेचं काहिच महत्त्व नाही. पण वास्तवात मात्र उलट आहे वेळेला खुप महत्व आहे.धन द्रव्य संपत्ती या पेक्षाही वेळ महत्वपूर्ण आहे महत्वाची वेळ एकदा निघून गेली तर काहीही केलं तरी पुन्हा ती वेळ परत येत नाही. पावसाळ्यात आपण एखाद पिक शेतात घेण्याचा निर्णय घेतला पण त्या पिकाची पेरणी पावसाळा संपत आल्यावर करून उपयोग



होईल का तर नक्कीच उपयोग होणार नाही पिक येणार नाही बी सुद्धा वायाला जाईल म्हणून योग्य वेळी योग्य निर्णय घेता आला पाहिजे.जी वेळ ज्या कारणासाठी आहे त्याच कारणासाठी प्रमाणिक पणे वापरली पाहिजे.शिक्षणाची एक योग्य वेळ असते हि योग्य वेळी सत्कारणी लावता आली पाहिजे अन्यथा आयुष्य दिशा हिन झाल्याशिवाय राहत नाही.जीवनात वेळेचं गांभिर्य आसल पाहिजे कधी काय करावं अथवा कोणती वेळ कशासाठी योग्य हे आपल्याला नाही समजलं तरी आपले पालक हितचिंतक हे आपल्याला नेहमी सांगत असतात सचेत करत असतात.आज आपल्याला जे कालबाह्य अयोग्य वाटत ते योग्य वेळी उचित वाटत म्हणून आज अभ्यास करणं कठीण वाटत असलं तरी आपलं वय वाढल्यानंतर तेच आपल्याला योग्य वाटेल पण तेव्हा समजुन उपयोग नाही अर्थ नाही म्हणून उचित वेळी शिक्षणाचं महत्त्व समजून आपलं जीवन सतकारणी लावता आले पाहिजे.

# आदिवासी समाजाचे वैविध्यपूर्ण सण उत्सव



डॉ. ज्योती रा. रामोड
संपर्क क्र. 9673774269

आधुनिक केसरी

**विविध धर्मात जातीत वेगवेगळ्या समाजात विविध सण, उत्सव साजरे केले जातात. याद्वारे समाजात संघभावना विकसित होते. एकमेकांच्या भावनांची, विचारांची कल्पनांची देवाण-घेवाण होते. जवळीकता निर्माण होते म्हणून सण, उत्सव साजरे केले जातात. आदिवासी समाजात बरेचशे हिंदू सण साजरे केले जातात. यांत स्त्रिया, पुरुष, बालके, मुली एकत्र येतात. गोडधोड खाणे, सोबत राहणे, सजावट करणे, एकमेकांची 'विचारपुस करणे, मदत करणे असा उद्देश असतो. हिंदू सणातील आदिवासी समाज विविध सण साजरे करताना दिसून येतो.**

**१) नागपंचमी :** निसर्गाची बदलत्या ऋतुचक्रात हा सण साजरा करण्यामागे परंपरेचे मोठे औचित्य आहे. आषाढ श्रावणात हा सण साजरा केला जातो. यात प्रामुख्याने नागदेवतेची आराधना केली जातो. नवीन लग्न झालेल्या स्त्रिया झोके खेळण्यासाठी माहेरी येतात, ही प्रथा आहे. शिव हा श्रद्धापात्र देव असतो. कुळाची संतती वाचावी, रक्षण व्हावे या उद्देशाने नागदेवतेची पूजा केली जाते. आदिवासी समाजाला नाग या सर्वसाधारण नावाने ओळखले जाते. हा सण अतिशय प्राचीन असून आदिवासी समाजात स्त्रियांचा या सणात मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून येतो.

**२) होळी :** होळीला हुतारानी, होलोकोत्सव, मदन दहन पोर्णिमा, पुतना दहन अशा नावाने ओळखले जाते. होळी पूजन, दुसऱ्या दिवशी धुलीवंदन व पुढे पाच दिवस वसंतोत्सव रंगपंचमी साजरी केली जाते.

होळीला नाचगाणे, मैफिल रंगविणे, पुरुषांच्या अश्लील बोबां या सणाला चालतात. आदिवासी समाजात, स्त्रियांसुद्धा नाचगाण्यांत सहभागी होतात व 'फगुवा' मागतात. रंगाची उधळण केली जाते. स्त्रियांच्या हस्ते भूमीच्या सुफलीकरणांची विधी पार पाडली जाते. वसंतोत्सवाच्या आगमनात येणारा हा सण आहे. आदिवासी समाजात हा सण मोठ्या आनंदाने साजरा केला जातो आणि यांत सर्वांचा सहभाग दिसून येतो.

**३) पोळा :** आदिवासी ग्रामीण लोक संस्कृतीत कृषीसंबंधी अतिशय महत्त्वाचा सण आहे. तीन दिवस हा सण साजरा केला जातो. बैलांना सजवून, त्यांना विविध अलंकार घालून गावातील मारूती मंदिरापासून फेरी मारून आणतात. सणाच्या दिवशी बैलांना कष्टाचे काम न लावता त्यांना आराम दिला जातो व खाण्यात पुरणपोळी, गोडभात देण्यात येतो. बैलांची मोठ्या श्रद्धेने पूजा केली जाते. आदिवासी समाजात पोळ्यासंबंधी विचारधारा म्हणजे गुराढोरांची समृद्धी आणि धनधान्यांची वृद्धी होय.

**४) महालक्ष्मी पूजन :** गौरीपूजन हा सणही तीन दिवसांसाठी साजरा केला जातो. आदिवासींच्या समाजात विघ्नापासून संरक्षण कर आणि कृषीमध्ये सुखसमृद्धी लाभू दे यासाठी तीन दिवस गौरीची पूजा श्रद्धेने केली जाते. या सणाच्या काळात कृषीही विविध फळे व भाज्यांनी नटलेली असते व तिचा प्रथम नैवद्य महालक्ष्मीच्या समोर मांडला जातो. हा सण विशेष रूपाने स्त्रियांसाठी आहे. यांत ही लक्ष्मीची अलंकार, साड्या आणि समोर विविध वस्तूंनी सजावट केली जाते. **५) दिवाळी :** असुर बळी राज्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा सण साजरा केला जातो. या दिवशीही गाईची पूजा केली जाते. सगळीकडे दिवे लावून



सजावट केली जाते. हा सण भाऊ-बहिन यांचा सण म्हणून ओळखला जातो. सगळ्या सासुरवाशीण स्त्रिया माहेरी येतात. आनंदाची गाणी गातात, नाच केला जातो. या सणात आदिवासी समाजात स्त्रिया, पुरुष, लहान मुले, मुली सहभागी होतात आनंदाने गृह सजावट करतात.

**६) संक्रांत :** सूर्याच्या मकर राशीतील संक्रमणामुळेच संक्रांतीला मकर संक्रांत असे म्हणतात या सणात स्त्रियांचा सहभाग महत्त्वपूर्ण असतो. पारंपरिक जुन्या चालिरीती प्रमाणे स्त्रिया एकमेकींना हळदी, कुंकवाला बोलावून वाण देणे हा प्रमुख उद्देश असतो. याद्वारे स्त्रिया एकमेकीना भेटतात. दैनंदिन जीवनातून नावीन्य या सणामध्ये स्त्रियांच्या चेहऱ्यावर पाहायला मिळते.

**७) दसरा** : हा सण रावण दहनच्या प्रीत्यर्थ साजरा केला जातो. या सणातही एकमेकांच्या घरी जाणे, सोनं देणे, मोठ्यांचे आशिर्वाद घेणे. भावनांची, विचारांची देवाण-घेवाण करणे. लहान मुले, मुली नटून-थटून एकमेकांच्या घरी जाऊन खेळतात, गाणी गातात.

**८) गोंधळ :** आदिवासी समाजात गोंधळ हा खूपच



लोकप्रिय आहे. विविध देवीना खुश करण्यासाठी गोंधळ घातला जातो. यात रात्रभर जागरण करून कीर्तने, नृत्य, गाणी, भजने, नाटके, कथा, पुराण यांचे आयोजन केले जाते. आदिवासी भागात मरीआई, पोचम्मा, रेणुका, कामाई या देवीच्या नावाने गोंधळ घातला जातो.

**९) नव्याचा सण :** शेतात नव्याने आलेल्या पिकांची आदिवासी बांधव प्रथम पूजा करतात. यावेळी आनंदाने गाणे, नृत्य केले जाते. स्त्रिया आलेल्या धान्यांचा स्वयंपाक बनवून देवतांना प्रथम नैवेदय दाखवतात आणि मग धान्य खातात.

**१०) इंदल :** भिल्लांचा महत्त्वपूर्ण सण होय. हा कृषीसंबंधीचा सण आहे. नवीन पीक शेतातून पीक घेण्यापूर्वी सर्व आदिवासी बांधव शेतात जमतात सामूहिक नृत्य करतात. निसर्ग देवताचे व कुलदेवतांचे, पशुदेवतांचे आभार मानण्याचा प्रयत्न करतात.

**११) भगोरिया :** होळीच्या सणाला काही आदिवासी भागात भगोरिया या नावाने ओळखले जाते. यांत विशेष रूपाने तरूण मुले, मुली, स्त्रिया व पुरूष आणि लहान बालके ही सहभागी होतात. रंग उधळतात, नाचतात. एकमेकां समवेत आनंद व्यक्त करतात.

**१२) नोवापंडूम :** माडियांचा महत्त्वपूर्ण सण होय. शेतीतील धान्याची कापणी झाल्यावर हा सण साजरा केला जातो. शेतातून धान्य घरी आणले जाते. देवाला नैवद्य दाखवून मग खाण्यासाठी वापरले जाते.

**१३) पिठी :** हा सण जंगलात साजरा केला जातो व पुरूष मोठ्या प्रमाणावर एकत्र येऊन दारू पितात. या सणात स्त्रियांचा सहभाग नसतो.

**१४) कोरा, सटी :** कोलामांचा मुख्य सण असून यात रिथया, पुरुष, बालके यांचा समावेश होतो. नाचगाणी, सामूहिक नृत्य यांत केले जाते. गाव जेवणाची सोय केली जाते. अतिशय आनंदी वातावरणात हा सण साजरा केला जातो. **१५) वाघ बारस :** हा सण शिकारीला गेलेला देव एका महिन्यांनी परत आला म्हणून त्या आनंदात हा सण गाणे म्हणून साजरा करतात. आदिवासींमध्ये प्रामुख्याने महादेव कोळी समाज हा सण साजरा करतो.

**१६) महाशिवरात्री :** हा सण महादेव या देवतेच्या नावाने साजरा केला जातो. या दिवशी बहुतेक बांधव उपवास ठेवतात. शंकराच्या दर्शनासाठी देवळांत जातात. स्त्रियांही यांत सहभागी असतात.

**१७) चेतावली :** चैत्र महिन्यात ऐतवार, मंगळवार या दिवशी बायका रात्रभर जागरण करून देवीची, बायांची, कान्हाची वेगवेगळी गाणी गातात व नृत्यही करतात. समाजातील सर्वांना एकत्रित करण्याची ही एक पद्धत आहे.

**१८) बोहाडा :** वैशाख महिन्यांत हनुमान जयंतीपासून देव देविकांची वेशभूषा करुन त्यावर लाकडी मुखवटे घालून गावदेवासमोर नाचतात, सर्व जण याचा आनंद घेतात. गावातील स्त्री पुरुष मुले या सर्वांचा यात मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो.

**१९) अक्षय्य तृतीया :** शुभमुहूर्ताचा दिवस मानला जातो या दिवशी नवीन खरेदी करणे पिकांची पूजा करणे, देवतांची आराधना करणे महत्त्वाचे मानले जाते. शुभ मुहूर्तावर खरेदी केल्यानंतर वर्षभर घरात कुठल्याही गोष्टीची कमतरता भासत नाही असा समज या आदिवासींमध्ये दिसून येतो.

अशा प्रकारे आदिवासी समाजात विविध सण, उत्सव साजरे केले जातात. त्यात गुढीपाडवा, वसुबारस, नवरात्र, कोवळीचा सण, आषाढी एकादशी हे सण देखील मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरे केले जातात. आदिवासी समाजात जसे वैविध्य पाहायला मिळते त्याचप्रमाणे त्यांच्या विविध सणावारांमध्येही विविधता दिसून येते. आदिवासींच्या सांस्कृतिक संवर्धनाची माहिती मिळते.

# तिहारची सुरक्षा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**तिहार जेल हे देशातील सर्वात सुरक्षित मानले जाते. तिहारपेक्षा जास्त सुरक्षित आणि हायटेक तुरुंग भारतात नाही, असे म्हटले जाते. होय, तिहारमध्ये कैद्यांची गर्दी इतर तुरुंगांच्या तुलनेत नक्कीच जास्त आहे. पण तरीही या तिहारमधून अनेकदा ड्रग्जची खेप आणि मोबाईल फोनही मिळतात.**




खुनासाठी चाकूही मिळतो आणि मारण्याची संधीही मिळते. तिहारमध्ये यापूर्वीही खुनाच्या अनेक घटना घडल्या आहेत. तिहार तुरुंगाची गणना देशातील सर्वोच्च सुरक्षा तुरुंगांमध्ये केली जाऊ शकते, परंतु हे देखील सत्य आहे की आपण कल्पना करू शकता अशी प्रत्येक गुन्हेगारी घटना तिहार जेलमध्ये घडली आहे. मग ती अंमली पदार्थांची तस्करी असो, मोबाईल फोनवरील खंडणीचा खेळ असो, कुणाच्या तरी नावाने सुपारी देण्याचा धंदा असो की सरळ खून असो. ही सर्व सत्ये वेगवेगळ्या वेळी समोर आली आहेत, कधी घटनांच्या रूपाने, तर कधी कारागृहातील छाप्यांमध्ये ही गुपिते समोर आली आहेत.

आशियातील सर्वात सुरक्षित म्हटल्या जाणाऱ्या तिहार तुरुंगात महिनाभरात दोन गुंडांची हत्या झाल्यानंतर तुरुंगाच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. गोगी टोळीच्या सदस्यांनी कारागृह क्रमांक ८ च्या उच्च सुरक्षा वॉर्डमध्ये बंदिस्त असलेल्या सुनील मान उर्फ टिल्लूवर लोखंडी ग्रीलने हल्ला केला, ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला. या हत्याकांडानंतर तिहार तुरुंगात बंद व्हीआयपी कैद्यांच्या सुरक्षेबाबत मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या महिन्याच्या सुरुवातीला तिहारच्या तुरुंग क्रमांक ,३ मध्ये बंद असलेला गँगस्टर प्रिन्स तेवतियाची निर्घृण हत्या करण्यात आली होती, तर या हल्ल्यात ३ कैदी जखमी झाले होते. एवढेच नाही तर यापूर्वीही अनेक प्रकरणांमध्ये गुन्हेगार अंकित गुर्जरचा खून झाला होता. मात्र, तिहारच्या वेगवेगळ्या तुरुंगात बंद असलेल्या कैद्यांकडून मोबाईल, धारदार शस्त्रे आणि ड्रग्ज जप्त करण्यासाठी तुरुंग प्रशासन वेळोवेळी सुरक्षा दलांसोबत मोहीम राबवत आहे. असे असूनही या गोष्टी मिळत आहेत. दिल्ली पोलिसांचे निवृत्त डीसीपी एलएनराव म्हणतात की तिहार जेल, जे एकेकाळी सर्वात सुरक्षित कारागृह म्हणून ओळखले जात होते, परंतु ज्याच्या तुरुंग महासंचालकांना लाचखोरीच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आले आहे, तेथील सुरक्षा राम भरोसे असेल. गंभीर मुद्दा असा आहे की, न्यायालयाने दोषी ठरवलेल्या आरोपींना तुरुंगात जिवंत ठेवता येत नाही, तर देशातील न्यायालयांनी टिल्लू ताजपुरिया किंवा अन्य गुंडांना कुठे नेऊन कोंडून ठेवायचे.

दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया तुरुंग क्रमांक एकमध्ये बंद आहेत. यासोबतच दिल्ली सरकारचे माजी मंत्री सत्येंद्र जैन हे देखील तुरुंग क्रमांक ७ मध्ये बंद आहेत, तर दिल्लीतील प्रसिद्ध गुंड टिल्लू ताजपुरियाची जेल क्रमांक ८ आणि ९ मध्ये हत्या करण्यात आली होती. इतर कारागृहांपासून या कारागृहाचे अंतर असले तरी अशा घटना सातत्याने समोर येत असल्याने सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे.

# महाविनाशाकडे वाटचाल ?



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**गेल्या 14 महिन्यांपासून युक्रेन-रशिया युद्ध सुरू आहे.या युद्धात दोन्ही पक्ष मागे हटायला तयार नाहीत.यामुळे दोन्ही देशांची वित्तीय हानी, लाखोंच्या संख्येने मानवीय हानी व सैन्य हानी होत आहे आणि याचा परिणाम संपूर्ण जगावर पडत आहे. परंतु युद्ध थांबविण्यासाठी मधला मार्ग युक्रेन,युनो,नाटो किंवा अमेरिका काढायला तयार नाही.**

युक्रेन नाटोमध्ये सहभागी होवू नये यासाठी रशिया युक्रेनसोबत आरपारची लढाई लढण्यास वचनबद्ध आहे,तर युक्रेन नाटोमध्ये सहभागी होण्याची जीद्दीवर अडून असल्याने रशिया सोबत दोन-दोन हात आहे. यामुळेच आज युक्रेन रक्ताच्या लाथोळ्यात वावरत असुन स्मशानभूमीमध्ये रूपांतर झाल्याचे दिसून येते.परंतु दिवसेंदिवस रशिया-युक्रेन युद्ध अतिशिगेला पोहचल्याने जगात केव्हा विनाशाची चिंगारी निर्माण होईल हे सांगता येत नाही.कारण गेल्या चौदा महिन्यांपासून युक्रेन -रशिया युद्धाचा संपूर्ण जगावर दळणवळणाच्या बाबतीत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अन्य देवाणघेवाणावर विपरीत परिणाम होत आहे. अशीच परिस्थिती रहाली तर पुढेचालुन महाभयावह परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागु शकते याला नाकारता येत नाही.कारण युक्रेन -रशिया यांच्यातील युद्ध दिवसेंदिवस तीव्र आणि अक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे. युक्रेनकडुन 3 मे 2023 च्या मध्यरात्री स्थानिक वेळेनुसार पहाटे अडीच वाजताच्या सुमारास रशियाच्या अध्यक्षांचे निवासस्थान असलेल्या क्रेमलिनवर ड्रोन हल्ला करण्यात आला.हा हल्ला म्हणजे नियोजित दहशतवादी कट होता आणि यातून पुतीन याची हत्या करण्याचा प्रयत्न होता आणि यात युक्रेनचा पुर्णपणे हात असल्याचे रशियन सुत्रांनी सांगितले आहे. कारण 9 मे ला रशिया दरवर्षी विजयी दिवस साजरा करीत असतो. परंतु विजयी दिवसाच्या पुर्वसंध्येला हा हल्ला घडवून आणण्यात आला.कारण या दिवसांसाठी परदेशी पाहुणे आली असून त्या दृष्टीकोणातुन हा हल्ला झाल्याची शक्यता आहे असे रशियन सरकारने म्हटले आहे.यामुळे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या हत्येचा कट युक्रेनच्या माध्यमातून होत असल्याचा आरोपही रशियाने केला आहे. दोन ड्रोनव्दारे क्रेमलिनवर हल्याचा प्रयत्न झाला. मात्र हे हल्ले तातडीने निष्क्रिय करण्यात आले. हल्याच्या वेळी पुतीन क्रेमलिनमध्ये नसल्याचे रशियन प्रशासकिय अधिकाऱ्यांनी सांगितले.परंतु क्रेमलिनवर ड्रोन हल्या हा संपूर्ण रशियावर हल्ला असे समजून पुतीन व रशिया प्रशासन आगबबुला झाले आहेत आणि सध्याच्या परिस्थितीत रशियाने युक्रेनवर अंधाधुंद मोठ्या प्रमाणात मिसाईलचा व बॉम्बचा वर्षाव सुरू केला आहे.आता रशियाकडून होत असलेले हल्ले न भूतो न भविष्यती अशाप्रकारचे होत असल्याचे सांगितले जाते.कारण रशियाने युक्रेनसह नाटो देशांना अनेकदा ताकीद दिली आहे आहे की रशिया अत्यंत घातक व विध्वंसकारी क्षेपणास्त्राचा केव्हाही वापर करू शकतो आणि त्या अनुषंगाने रशियाने अत्याधुनिक घातक मिसाईलचा जमावडा आपल्या मित्र राष्ट्रांच्या सिमांवर करून ठेवला आहे.कारण युक्रेनचा क्रेमलिन वरील हल्ला म्हणजे रशियाच्या काळजात केलेला वार आहे ( सापाच्या शेपटीवर युक्रेनने पाय ठेवला आहे ) त्यामुळे क्रेमलिन हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर जो कोणी युक्रेनच्या मदतीला येईल त्याला सुद्धा नेस्तनाबूत करण्याचे व्लादिमीर पुतीन यांनी सध्याच्या परिस्थितीत मनात पुर्णपणे ठाणले आहे. कारण रशियाच्या अनेक नेत्यांनी व अधिकाऱ्यांनी आरपारची लढाई लढुन किव्हसह युक्रेनला नेस्तनाबूत करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे यापुढील रशिया-युक्रेन युद्ध सिमित नसुन आता विश्व युध्दाच्या अगदी जवळ आल्याचे दिसून येते. क्रेमलिनवरील ड्रोन हल्ल्यानंतर रशियाने तीव्र शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.यापुढे युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी कोणतीही वाटाघाटी करू नये असे राजकीय गोटातून सुर निघत आहे. त्याचबरोबर किव्हला नष्ट करण्याचे आव्हान रशियन अधिकाऱ्यांनी केले आहे म्हणजेच रशिया युक्रेन युद्ध महाविणाशाकडे जातांना दिसत आहे.आतापर्यंत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यावर सहा वेळा जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला.परंतु आताचा क्रेमलिन येथील पुतीन यांच्या निवासस्थानी हल्ला युद्धजन्य परिस्थिती युक्रेनने केल्याने रशिया युक्रेनसोबत आरपारच्या युद्धाच्या मुडमध्ये आहे. त्यामुळे रशिया युक्रेनला पुर्णपणे जमिनदोस्त करण्याच्या तयारीत आहे.

# महामंडळाच्या बसेसला पीरबावडा स्थानकाचे वावडे

## राज्य सरकारच्या महिला, वयोवृद्धांसाठीच्या सवलतींना चालक-वाहकाकडून केराची टोपली

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** फुलंब्री - राजूर राज्यमंहामार्गावर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस धावतात राज्य शासनाने महिलांना अर्धे भाडे, वयोवृद्ध ज्यांचे वय पंचाहत्तर आहे त्यांना मोफत प्रवास आदी सवलती दिलेल्या आहेत. जेणे करून राज्य परिवहन मंडळाच्या बसेस मध्ये प्रवाशी बसावेत जेणे करून ग्रामिण भागातील महिला, वयोवृद्ध, विद्यार्थी आणि दिव्यांगांना या योजनेचा लाभ तर मिळावाच परंतु तोट्यात असलेले राज्य परिवहन मंडळाची तिजोरी या मुळे भरावी परंतु राज्य परिवहन मंडळ चालक व वाहक यांच्या मनमानी वर अंकुश ठेवण्यात कमी पडतंय आणि या मुळे ह्या योजना केवळ जाहिराती मध्ये बघून सर्वसामान्य प्रवाश्यांना पाश्चाताप करावा लागतोय. फुलंब्री - राजूर रोडवर पीरबावडा हे मोठ्या लोकसंख्या चे व बाजारपेठ असलेले गाव असून जवळपास पंधरा ते वीस गावांचा दांडगा संपर्क या गावाशी येतो. पिरबावडा येथून अनेक कर्मचारी, विद्यार्थी, शेतकरी, महिला, दिव्यांग व रुग्ण आदी तालुक्यात, जिल्ह्यात जाण्या येण्यासाठी पिरबावडा येथून प्रवास करतात. परंतु राज्य परिवहन महामंडळ च्या बसेस पिरबावडा येथील गावातील बस स्थानकावर थांबत नसल्याने प्रवाशांना खासगी वाहनाने प्रवास करावा लागतो. पीरबावडा येथील बसस्थानकावर बस थांबून प्रवासी घ्यावेत आलेल्या प्रवाश्यांना बसस्थानक सोडून उतरवू नये अशी अनेकदा प्रवाशांनी विनंती करून देखील या मार्गावरील बस चे वाहक व चालक मनमानी करून प्रवाशांना अरेरावी देखील करतात यामुळे अनेकदा वाद विवाद घडतात यासाठी पिरबावडा व परिसरातील नागरिकांची मागणी आहे की पिरबावडा येथे गावात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात बसेस थांबवायला हव्यात जेणे करून प्रवाश्यांना सोयीचा प्रवास होईल व राज्य परिवहन महामंडळ राबवत असलेल्या योजना सर्वसामान्य जनते पर्यंत पोहचेल.



आम्हाला कुठल्याही कामासाठी फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर आदी ठिकाणी जाण्या-येण्यासाठी पीरबावडा येथून प्रवास करावा लागतो परंतु अनेकदा एस. टी थांबत नसल्याने गैरसोय होते बसेस थांबल्या तर आमचे कामवेळेवर होतील.

**पंडीत ठोंबरे जेस्ट नागरिक पीरबावडा**

पीरबावडा येथे मुक्कामी बस असणे अत्यंत गरजेचे असून यासाठी जर प्रयत्न झाले तर अनेक विद्यार्थ्यांना सहज शिक्षण, कोर्सेस साठी मोठी मदत मिळेल कारण बसेस थांबत नाहीत, मुक्कामी बस नाही यामुळे पर्याय म्हणून खासगी वाहनाने प्रवास करावा लागतो. **निवृत्ती काळे**

# शेवगाव शहर कडकडीत बंद

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त शेवगाव शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आल्याची घटना रविवार रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली ही मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर अचानक दगडफेक सुरू झाल्याने एकच धावपळ उडाली दोन गटात एकमेकावर दगडफेक झाल्याने पोलिसासह अनेक जण जखमी झाले तर परिसरातील दुकानाच्या नावाफलक व काचा फोडण्यात आल्या तसेच रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या दुचाकी चारचाकी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आले दगडफेकी नंतर शेवगाव शहरात त्यांना भीतीचं वातावरण निर्माण झाले परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शेवगावचे आमदार मोनिका राजळे यांनी सोमवारी सकाळी घटनाग्रस्त भागाची तसेच जखमींची भेट घेऊन जनतेला शांततेचे आवाहन केले. शेवगाव शहरात रविवारी रात्री झालेल्या दगडफेकीच्या निषेधार्थ व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आल्याने तसेच वैद्यकीय सेवा व औषधाचे दुकानदारांनीही दवाखाने व दुकाने बंद ठेवून बंदमध्ये सहभागी होऊन घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला . शहरातील सर्व दुकाने बाजारपेठ हॉटेल तसेच बाजार समितीतील धान्य व्यापारी बंदमध्ये सहभागी झाल्याने दिवसभर सर्व व्यवहार बंद असल्याने कडकडीत बंद शंभर टक्के यशस्वी झाला असून या घटनेमागील मास्टरमाईंड असलेल्या व्यक्तीवर कडक कारवाई करावी तोपर्यंत व्यवहार सुरू न करण्याचे आवाहन व्यापारी वर्गातून करण्यात आले आहे. आज मंगळवारी दुसऱ्या दिवशीही व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून जो पर्यंत दंगल घडविणाऱ्यांना पोलिस अटक करीत नाही तोपर्यंत शेवगाव शहर बंद ठेवण्याचा निर्णय व्यापाऱ्यांनी घेतला असून व्यापारी भितीच्या सावटाखाली आहेत बंदमुळे प्रशासनही अडचणीत सापडले आहे. दरम्यान शेवगाव घटनेच्या निषेधार्थ पाथर्डी शहरातील व्यापाऱ्यांनी पाथर्डी शहर बंद ठेवून शेवगावच्या व्यापाऱ्यांना पाठिंबा दिला आहे. गेल्या दोन महिन्यापासून छत्रपती शिवाजी महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व रमजान ईद रामनवमी आदी सण उत्सवाच्या निमित्ताने शेवगाव शहरात रस्त्याच्या दुतर्फा लावण्यात आलेल्या भगव्या निळ्या हिरव्या झेंड्यामुळे मोठ्या प्रमाणात तणावजन्य परिस्थिती निर्माण झालेली होती. आजच्या दगडफेकीलाही झेंड्याची पार्श्वभूमी कारणीभूत आहे गेल्या दोन महिन्यापासून शेवगाव शहरात वरून शांतता दिसली तरी झेंड्याचे कवित्व अद्यापही सापडलेले नसून हिंदू मुस्लिम समाजात जातीय तणाव वाढतच आहे. शहरात गेल्या काही दिवसापासून वाढलेल्या अवैध धंदे, बेकायदेशीर वेश्या व्यवसाय, अवैध मावा -गुटखा विक्री राजरोसपणे चालणारी वाळूची तस्करी, अमली पदार्थ विक्री, देशी विदेशी बनावट दारू विक्री तसेच तालुक्यात वाढलेली गुन्हेगारी यामुळे शेवगाव पोलिसांचा गुन्हेगारावर अंकुश नसल्याने अनेक गुन्हेगारांना खुलेआम गुन्हेगारी करण्याचा जणू परवानाच मिळाल्यागत शेवगाव शहरात व तालुक्यात परिस्थिती निर्माण झाली असल्याने अनेक नवनवीन गुन्हेगारांच्या टोळ्या गावागावात निर्माण झाल्या आहेत. शेवगाव शहरात सुरू असलेले अवैध धंदे मटका जुगार बिंगो खुलेआम सुरू असलेला वेश्या व्यवसाय हा गुन्हेगारांना आर्थिक फायद्याचा असल्याने तसेच शेवगा शहरातून राज्यभर व राज्याबाहेरही विक्रीसाठी जाणारा मावा गुटखा हाही या दंगलीच्या पार्श्वभूमीला कारणीभूत ठरत असल्याने पोलिसांनी या दंगली मागील मास्टर माईंड कोण आहे याचा शोध घेऊन कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे. काल दुपारी जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांनी पुन्हा शेवगाव शहराला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली परिस्थिती नियंत्रण असल्याचे समाधान यावेळी बोलताना व्यक्त केले.



पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी सोमवारी शेवगाव येथील अधिकारी आणि व्यापारी यांच्याशी चर्चा करून घटनास्थळी पाहणी केली दंगलखोरांवर कडक कारवाई करण्याचे आश्वासन देऊन बंद मागे घेण्याचे आवाहन केले मात्र अनेकजण खुलेआम फिरत असून दंगल घडविण्याऱ्यां विरोधात कडक पोलिस कारवाई व अटक होत नाही तोपर्यंत शेवगाव शहर बंद ठेवण्याचा निर्णय व्यापाऱ्यांनी घेतला आहे. घटनेच्या वेळी कोणी दगडफेक केली यांचे सीसीटीव्ही कॅमेरा चित्रीकरण पोलिसांना मिळाले आहे त्यानुसार दंगल घडविण्याऱ्यांची धरपकड चालु असून वेगवेगळे पोलिस पथक तपास करीत आहेत.

# नुसती एकट्याची प्रगती होऊन उपयोग नाही : आ. दीपक चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** पूर्वी ग्रंथप्रमाणे ग्रंथ प्रमाण मानून त्याप्रमाणे वागायचं. परंतु बुद्धीवाद हा जो आहे, ग्रंथामध्ये काय लिहिलंय यापेक्षा आपल्या विवेक बुद्धीला काय समजतय, काय स्मरतय हे लक्षात घेऊन, थोडा विचार करून जर वागलं तर ते योग्य ठरतं. ही आपल्याला बाबासाहेबांनी शिकवण दिली. ग्रंथप्रमाण न मानता आपल्याकडे बुद्धी वेग आहे. आपल्याकडे ज्ञान आहे. यावर विचार करा. सारासार विचार करून निर्णय घ्या.म्हणून त्यासाठीच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जो आपल्या बौद्ध धम्माचा स्वीकार केला.लाखो अनुयायी त्याठिकाणी १९५६ साली नागपूर ला फार मोठं हे झालं म्हणून अशा रीतीने विचार आपल्या समाजा मध्ये पोहचला पाहीजे. त्याप्रमाणे अनुकरण केलं पाहिजे. नुसतं स्वतःपुरतं न बघता, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला हेच सांगितले की आपली स्वतःची प्रगती करता,ज्यांना ओढता येईल त्यांना आपण वर उचललं पाहिजे.खऱ्या अर्थाने समाज आपला एकवटेल,समाजाची प्रगती होईल,नुसती एकट्याची प्रगती होऊन उपयोग नाही. असे प्रतिपादन आ.दीपक चव्हाण यांनी केले.ते फलटण तालुक्यातील परहर बुद्रुक येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातून बोलत होते.

संम्बोधी बुध्द विहारामध्ये संम्बोधी संघटना संलग्न माता रमाबाई महिला मंडळ यांच्या वतीने तथागत गौतम बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले,छत्रपती शाहू महाराज,विश्वरत्न भारतीय



राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती आणि तथागत गौतम बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती प्रतिष्ठापनेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.भंते थेरो दिपंकर यांच्या हस्ते मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा संपन्न करत असताना कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी आ.दीपक चव्हाण, उदघाटक म्हणून जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर होते. तसेच प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य शिवाजी सावंत हे होते. तसेच जि.प.सदस्य दत्ता अनपट,काश्यप दादा साळुंके,अविनाश देशपांडे,शंकर कांबळे,अमोल रासकर,अमोल गायकवाड,रामचंद्र रणखांबे,अक्षय गायकवाड,रोहिदास उंब्रटकर आदीं सह इतर मान्यवर तसेच बौद्ध उपासक उपासिका व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. आपण एकत्र येऊन आपल्या समाजाची प्रगती करण्याबरोबरच ज्या समाजामध्ये उपेक्षित, गरीब, अपंग लोक आहेत. त्या लोकांना मदत करण्याचे आवाहन सुद्धा आ.दीपक चव्हाण यांनी उपस्थित समाज बांधव भगिनीं यांना केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खूप मोठे अर्थतज्ञ होते. त्याकाळी त्यांनी रुपयाचा प्रश्न मांडला. विषमता आणि मूठभर लोकांची श्रीमंती होती. आज रोजी रोटीचा प्रश्न सोडवण्यासाठी तसेच विषमता नष्ट करण्यासाठी आपल्या सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले.

या प्रसंगी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. प्रमुख वक्ते म्हणून कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी सावंत यांचे ही मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी मान्यवर मंडळींचा सन्मान भारतीय संविधानाची उद्देशिका देऊन करण्यात आला. बौद्ध धम्माचे प्रतीक असलेल्या पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण सुद्धा करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष राजू मोरे, प्रमुख सल्लागार अंकुश मोरे,उपाध्यक्ष सागर मोरे, पदाधिकारी संदीप मोरे, प्रवीण मोरे, अंकुश मोरे, आकाश मोरे, गणपत मोरे आदींसह इतर कार्यकर्ते यांनी विशेष मेहनत घेतली.आसपासच्या गावांतील कार्यकर्ते, पदाधिकारी कार्यक्रमास उपस्थित होते. संध्याकाळी मिरवणूक झाल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

# बी.जे.एस. व शासनाकडून तलावांचे होणार पुनरूज्जीवन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** महाराष्ट्र शासनामार्फत जलयुक्त शिवार 2.0 तसेच केंद्र शासनामार्फत जलजीवन मिशन या योजनांच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर होणार आहेत. त्या दृष्टीने लोकसहभाग वाढविण्यासाठी तसेच ग्रामपंचायतींमार्फत मागणी अर्ज भरून घेण्यासाठी ( बी.जे.एस ) भारतीय जैन संघटनेच्या वतीने माहितीपूर्ण प्रचाररथ संपूर्ण वैजापूर तालुक्यात फिरणार आहे. दि. 17 मे बुधवार रोजी प्रचार रथाचा शुभारंभ गटविकास अधिकारी हनुमंत बोयनर, नगराध्यक्षा सौ.शिल्पाताई परदेशी, मा.नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी वैजापूर तालुका किराणा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाशचंद बोथरा, वैजापूर मर्चंट बँकेचे चेअरमन विशाल संचेती, वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेचे मा. चेअरमन हेमंत संचेती, राजेंद्र पारख, राजेश संचेती, प्रफुल संचेती, जलसंधारण विभागाचे कांबळे , साखरे , जाधव , भारतीय जैन संघटनेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष किशोर ललवाणी, उपाध्यक्ष निलेशकुमार



पारख, संभाजीनगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य अमृत बोथरा, महेश हिरण, किरण सारडा अमित संचेती, मनेष संचेती, संजय संचेती, विनय संचेती, आयुष संचेती, मनील हिरण, भूषण बोधरा, शैलेश संचेती, संजयजी बोरनारे, जयमालाताई वाघ, नगरसेविका सुप्रियाताई व्यवहारे, शामभाऊ कोतकर, गौरव दोडे, शैलेश पोंदे, रामजी पाटील वाघ, दीपक सारडा, पायोनियर सीड कंपनीचे सागर पांडे, पंकज संतपाळ, व्यापारी पप्पूशेठ अग्रवाल, सुरेंद्र संचेती, विक्रम अग्रवाल, आनंद संचेती, भारतीय जैन संघटनेचे समन्वयक गीते उपस्थित होते.



# चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात दोन वाघ जेरबंद



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात दोन वाघ जेरबंद करण्यात आले आहेत. भारतीय वन्यजीव संस्था, डेहराडूनच्या कार्यक्रमांतर्गत या दोन्ही वाघांना वैद्यकीय तपासणीनंतर नवेगाव-नागझिरा अभयारण्यात सोडण्यात येणार आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प तसेच चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या संख्येने वाघ आहेत. अभ्यासकांच्या मते वाघांची वाढती संख्या मानव-वन्यजीव संघर्षाचे एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील सहा वाघ नवेगाव-नागझिरा अभयारण्य तसेच जिथे वाघांची संख्या कमी आहे, अशा अभयारण्यात सोडण्याचा कार्यक्रम भारतीय वन्यजीव संस्था तथा वनविभागाने तयार केला आहे.

हा कार्यक्रम प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येकी एक अशा दोन वाघांना जेरबंद करण्यात आले. ताडोबा प्रकल्पाचे संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरीच्या जंगलातील तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील शिवणी-करवा वनपरिक्षेत्रातील दोन वाघ जेरबंद करण्यात आले आहेत. यातील शिवणी-करवा जंगलातील वाघ चंद्रपूर येथेच जेरबंद आहे. भारतीय वन्यजीव संस्थाचे अभ्यासक तथा पशुवैद्यकीय अधिकारी या दोन्ही वाघांची वैद्यकीय तपासणी करतील. वाघांची प्रकृती उत्तम असल्याची खातरजमा केल्यानंतर भारतीय वन्यजीव संस्था, डेहराडूनचे अधिकारी वाघांना नागझिरा अभयारण्यात सोडण्याचा निर्णय घेतील. वाघ स्थलांतरणचा संपूर्ण कार्यक्रम भारतीय वन्यजीव संस्था राबवित आहे. त्यांच्याच मार्गदर्शनात हा संपूर्ण प्रोजेक्ट सुरू असल्याचेही ते म्हणाले. दरम्यान, ताडोबाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे व त्यांच्या पथकांनी अथक परिश्रम घेत या वाघांना जेरबंद केले.

# दानपेटी, पादुका चोरणाऱ्यांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** व्याघ्रंबरी देवीच्या मंदिरातील दानपेटी व चांदीच्या चरण पादुका अशा २० हजारांच्या मुद्देमालाची चोरी करणाऱ्या तिघा भामट्यांना पोलिसांनी अटक केली. १३ मे रोजी पहाटेच्या सुमारास मंदिरातील दानपेटी व चरण पादुकांची चोरी झाली होती. पुजारी हरीश मोरे यांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल नंदावले ( २०, रा. भायगाव शिवार ), अजय परदेशी ( २०, रा.मोतीबाग नाका ) आणि दीपेश उर्फ चिल्या गवळी ( रा. गवळी वाडा ) या तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यांचा अन्य साथीदार मयूर उर्फ चिन्या गांगुर्डे ( रा.श्रीकृष्णा नगर ) हा फरार आहे.



# पोलिसांनी जपली 50 वर्षांची परंपरा

## जातीय सलोखा व एकात्मतेसाठी चढवली मानाची चादर

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान असलेले हजरत सय्यद शाह रुकनोद्दीन शहीद ( रह अ. ) ऊर्फ नौगाजी बाबा यांचा ऊर्स दि. 6 मे रविवारपासून उत्साहात सुरू आहे. दर्गा परिसर हा भाविकांमुळे गजबजले आहे.

यानिमित्ताने गेल्या ५० वर्षांची परंपरा असलेली जातीय सलोखा व राष्ट्रीय एकात्मतेसाठी निघणारी पोलिसांची मानाची चादर ही मंगळवारी दर्गाहवर अर्पण करण्यात आली. शहरातील हजरत सय्यद शाह रुकनोद्दीन शहीद ( रह अ. ) ऊर्फ नौगाजी बाबा यांची दर्गा जातीय सलोखा व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. सर्वधर्मीय भाविक मनोभावे यात्रेत सहभागी होऊन वार्षिक यात्रोत्सवात सहभागी होतात. दरवर्षी यात्रोत्सव जास्तीत जास्त मे महिन्यात साजरा होत असते. साधारणतः ५० वर्षांपासूनच्या पारंपरिक प्रथेनुसार वैजापूर पोलिस ठाण्याच्या वतीने चादरची मिरवणूक काढण्यात येते. मंगळवारी दि. 16 मे रोजी संध्याकाळी वैजापूर पोलिस ठाण्याच्या आवारातून प्रथेनुसार पारंपारिक वाद्य ढोल ताशा च्या गजरात नौगाजी बाबा यांच्या यात्रोत्सवानिमित्त चादरची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत सहाय्यक पोलीस अधीक्षक महक स्वामी मॅडम, प्रभारी पोलीस निरीक्षक संजय लोहकरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय नरवडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक इंगळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक राम घाडगे, पोलिस उपनिरीक्षक मनोज पाटील पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत,पोलीस उपनिरीक्षक श्रीराम काळे, पोउपनि रज्जाक शेख, पोउपनि कल्याण पवार, गुन्हे शाखेचे विजय भोटकर, आत्माराम पैठणकर, महादेव निकाळजे, पोलीस अंमलदार मोईज बेग, योगेश झाल्टे, गणेश पठारे, शिंदे, अजय गोलवाल, शिराळे, अव्हाळे, सरोदे, जगताप, जोनवाल, भगवान सिंघल, योगेश कदम,प्रशांत गिते, पंकज गाभुड, वाल्मीक बनगे, गोरक्ष सदगीर, नवनाथ केरे, नवनाथ निकम, ज्ञानेश्वर पाडळे, गणेश पैठणकर, मपोना सिमा जाधव, महिला पोलीस कॉ. मुंडे, मोना पवार आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांसह शांतता कमिटी चे सदस्य तथा नगरसेवक रियाज शेख उर्फ गब्बू सेट, शहर काजी काजी हफिजोद्दिन, अल्ताफ बाबा, फेरोज पठाण, इरफान सेट, रियाजोद्दिन शेख फिरोज भाईजान, अबरार मिर्झा, गुलाम काकर, एराज शेख, बाबा सेट, अकील कुरैशी, ॲड. जावेद बेग, आयुब शेख, जुबेर चाऊस, शोहेब शाह, हारिस शाह आदी सदस्य या मिरवणुकीत सहभागी झाले. दरवर्षी पोलिसांकडून चादर अर्पण करण्यात येते. हि परंपरा मागील ५० वर्षांपासून ही प्रथा पाळली जाते. दरवर्षी दर्ग्याच्या आवारात यात्रोत्सव भरविण्याची पारंपरिक प्रथा आहे. यंदाचा उरूस हा 911 वा असल्याची माहिती दर्गा खादिम कडून देण्यात आली आहे.

या उरूसमधील 'खाजा' या खाद्य पदार्थाचे विशेष आकर्षण असते. औरंगाबाद जिल्ह्यातील च नव्हे तर मराठवाड्यातील ही एकमेव पारंपरिक मोठी यात्रा मानली जाते. या यात्रेचा सर्वधर्मीय नागरिक मोठ्या संख्येने आनंद लुटतात. जातीय सलोख्याचे प्रतीक म्हणून ह्या दर्ग्याचा नावलौकिक आहे. यात्रोत्सवानिमित्त दर्ग्यावर आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे.

ऊर्स यात्रेसाठी पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया, अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार, सहाय्यक पोलीस अधीक्षक महक स्वामी, प्रभारी पोलीस निरीक्षक संजय लोहकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. साध्या वेशातील पोलिसांसह महिला पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे.



# पोलिसांची संयुक्त कारवाई; पत्ते खेळणारे ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** औरंगाबाद ग्रामीण पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांच्या पथकाने व सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय कार्यालय वैजापूरच्या महक स्वामी यांच्या पथकाने गंगापूर पोलीस ठाणे हद्दीत संयुक्त कारवाई करत पत्ते खेळणाऱ्या 11 जणांना ताब्यात घेत एकूण 36,88,930 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कारवाई औरंगाबादच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम सिरसाठ,सपोनि देविदास वाघमोडे, वैजापूर येथील पाउपनि काळे,पो. ना. जावेद शेख,अमोल मोरे,पो. ना.आत्माराम पैठणकर,योगेश कदम यांच्यासह आदींनी केली आहे.

# महाविद्यालयासाठी आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा:** प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हिंगणघाट येथेच व्हावे म्हणून नागरिक निकराचा लढा देत आहे. बंद, धरणे नंतर आज लोटांगण आंदोलन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते श्याम इडपवार यांनी दुपारी रणरणत्या उन्हात हे आंदोलन सुरू केले. गांधी पुतळा ते आमदार समीर कुणावार यांच्या घरापर्यंत ते लोटांगण घालत जाणार तोच पोलीसांनी धाव घेतली. श्याम यांना पकडुन स्थानबद्ध करण्यात आले. आंदोलन दडपण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. सामाजिक संघटना व राजकीय नेत्यांनी याचा निषेध करीत हा सत्याग्रही गांधीजींचा अपमान असल्याचे मत मांडले. महाविद्यालयसाठी जनता आक्रमक झाली असून तणाव निर्माण होऊ नये म्हणून प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली पाहिजे, असे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश पदाधिकारी अतुल वांदिले यांनी स्पष्ट केले. राजकीय दबावातून आंदोलन दडपल्या जात असल्याचा आरोप प्रहारचे गजू कुबडे यांनी केला. तर कॉंग्रेसचे प्रवीण उपासे यांनी आमदार यांनीच दबाव टाकून हे आंदोलन उधळून लावल्याचा आरोप केला. आमदारांना सद्बुद्धी मिळो,असेही ते म्हणाले. या शासकीय महाविद्यालयास वर्धा येथे मंजुरी मिळाल्यानंतर हिंगणघाट व आर्वी येथून मागणी सुरू झाली आहे.



# श्री श्री रविशंकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** आर्ट ऑफ लिविंग परिवाराचे प्रणेते गुरुदेव श्री श्री रविशंकर यांचे जन्मदिवसाचे निमित्ताने येथील साधक परिवाराच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते या शिबिरात उत्स्फूर्त प्रतिसाद देत ६४ जणांनी रक्तदान केले. हे शिबिर शहरातील स्वामी दिव्यानंद उद्यान येथे घेण्यात आले. तसेच वाघेश्वर मंदिर परिसरात उभारण्यात येणाऱ्या श्री श्री ध्यान मंदिराचे भूमिपूजन युवानेते डॉ. अंकुश लाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार नकुल वाघुंडे, पालिका मुख्याधिकारी कोमल सावरे, आर्ट ऑफ लिविंगचे महाराष्ट्र समन्वयक शरद डोल्हारकर, जिल्हा समन्वयक विजयकुमार कत्रुवार, भास्कर मगर आदी मान्यवर उपस्थित होते. गुरुदेव यांच्या जन्मदिवसाचे निमित्ताने सायंकाळी भजनसंध्या हा भक्तीसंगीताचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला शरातील भक्तांनी खूप छान प्रतीसाद दिला हा कार्यक्रम जवळपास 3 तास चालला. शरद डोल्हारकर, भास्कर मगर व त्यांच्या साधकांनी यात सहभाग नोंदवला. या सर्व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सवात मोलाचा वाटा सूर्यप्रकाश तिवारी, सुनील बोरवने यांनी उचलला त्यांना इतर सर्व साधकांनी मदत केली. सकाळची साधना सुर्यप्रकाश तिवारी काका यांनी घेतली.



# बाभुळतेल येथे पंचमी महोत्सवाला सुरुवात

## सर्वेक्षण करुन कलावंतांना मानधन द्या; बंडुनाना धुळेकर

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील बाभुळतेल येथे अनेक वर्षापासून पंचमीमहोत्सवाचे आयोजन केले जाते या महोत्सवात गणपती, सरस्वती, भालदार चोपदार राम लक्ष्मण नरसिंह, चंद्र-सुर्य, नारदमुनी, तंट्याभिल्ल, विदुषक, सांडीन मैशासुर, नंदी आदींची सोंगे काढण्याची परंपरा आहे. सोंगधारी कलाकारांची तुतारी पीपाणी संबळ आशा पारंपरिक वाल्यांच्या सुमधूर आवाजाच्या गजरात मिरवणुक काढली जाते.शेवटी देविच्या मिरवणुकीने पंचमीमहोत्सवाचीसांगता झाली हि सोंगे पाहण्यासाठी बाभुळतेल पंचक्रोशीतील नागरीक मोठ्या संख्येने दरवर्षी गर्दी करतात. यंदाच्या महोत्सवात धुळे जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कलावंत बंडू नाना धुळेकर व सुनिताबाई धुळेकर तमाशा मंडळ 35 कलावंत नागरिकांचे मनोरंजन करत आहेत. पेशवाई काळापासून महाराष्ट्रात तमाशा हे मनोरंजनाचे मुख्य साधन मानले जाते मात्र सरकारने वेळेचे बंधन घालुन दिल्याने तमाशा कलावंताची आधोगती होत आहे. तसेच प्रेक्षकांची



आभिरुची बदलल्याने गण गैळण भारुड पोवाडे वग नाट्य आदि सांस्कृतिक कार्यक्रमांना बगल देऊन प्रेक्षकांच्या मागणी नुसार हिंदी मराठी चित्रपटाच्या गाण्यावर कार्यक्रम सादर करावे लागतात.पुर्वी वगनाट्य हे तमाशाचे मुख्य आंग होते तमाशा सादरीकरणाला वेळेचे बंधन आल्याने सादरीकरणाचा खरा आनंद मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. त्यांतच प्रेक्षकांची हुल्लडबाजी आदी गोष्टींचा सामना करावा लागत असल्याची खंत बंडु नाना धुळेकर यांनी आधुनिक केसरीशी बोलताना व्यक्त केली. शिवाय सततच्या फिरतीमुळे शासनाकडून मिळणाऱ्या आनेक सोई सुविधा तसेच योजनांच्या लाभापासून तमाशातील कलावंत दुर राहत असून कलावंताना मिळणारे फायदे आन्य व्यक्तीच घेत आहे.
पूर्वापार चालत आलेली महाराष्ट्राची लोककला जिवंत ठेवण्यासाठी तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी या तमाशा कलावंताना महाराष्ट्र फिरवावेत लागते. त्यामुळे मुलाबाळांच्या शिक्षणाचे यामुळे नुकसान होते. दर्जेदार शिक्षण घेण्याची कितीही ईच्छा आसली तरी त्यांच्या मुलांना शिक्षण मिळत नासल्याने शेवटी त्यांची मुले तमासगिरच होत आहे. त्यामुळे शासनाने तमाशा कलावंतांच्या मुलांसाठी शाळा सुरु केल्या पाहिजे तसेच कलावंताना स्वतःचे घर व जमीन नासल्यामुळे उतार वयात हाल होतात मात्र मजबुरी आणी तमाशाची आवड आसल्याने आमच्यासारखे हजारो तमाशा कलावंत महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात जाऊन मनोरंजनाच्या माध्यमातून जनजागृतीचे काम करत आहे त्यामुळे कलावंताचे सर्वेक्षण करुन कलावंताना मनधन द्या जेनेकरुण कलावंतांना सन्मानाने जगता येईल आणि महाराष्ट्राची लोककला जिवंत ठेवण्यासाठी कलावंत मनापासून घडपड करतील पण त्यासाठी मायबाप सरकारने मायेचा हात कलावंतांच्या पाठिवर पडणे आवश्यक आहे बंडुनाना धुळेकर यांनी आधुनिक केसरीशी बोलतांना सांगितले. या कार्यक्रमासाठी बाभुळतेल ग्रामपंचायत वि.वि.का सोसायटी तसेच गावातील नागरिकांचे सहकार्य लाभत आहे.

# १८ लाखांचा सुगंधित तंबाखूचा साठा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** यशोधरानगरातील गोमांस विक्रेत्यांवर धडाकेबाज कारवाई केल्यामुळे युनिट तीनचे पथक चर्चेत आले होते. मात्र, त्यांच्याच हद्दीत सुगंधित तंबाखू, अवैध सडकी सुपारी, धान्याचा काळाबाजार आणि गुटखा विक्री जोरात सुरू असल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने प्रकाशित केले होते. त्यामुळे गुन्हे शाखेने लकडगंज हद्दीत सुगंधित तंबाखूच्या गोदामावर छापा घालून १८ लाखांचा तंबाखू जप्त केला. लकडगंज, तहसील, कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक अवैध धंदे सुरू होते. त्या धंद्यांना तपास (डीबी) पथकातील कर्मचाऱ्यांचा 'आशीर्वाद' होता. त्यामुळे कोट्यावधींची उलाढाल सडकी सुपारी, गुटखा, तंबाखू, क्रिकेट बुकी-सट्टेबाज आणि सुगंधित तंबाखूच्या अवैध विक्रीतून होत होती. पोलीस मित्र टप्पू, श्याम, मुसळे, मोरे, नितीन यांनी अवैध धंदेवाल्यांशी साटेलोटे केल्यामुळे कुठेही कारवाई होत नव्हती. युनिट तीनने यशोधरानगरातील गोमांस विक्रेत्यांवर कारवाई करीत पोलीस आयुक्तांकडून पाठ थोपटून घेतली होती. मात्र, त्याच युनिटच्या 'आशीर्वादा'ने अवैध धंदे सुरू असल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे गुन्हे शाखेच्या पथकाने तातडीने कारवाई करीत १८ लाख ५४ हजार रुपयांचा सुगंधित तंबाखू जप्त केला. रूपेश अरुण नंदनवार, दत्तू बबनराव सराटकर यांना ताब्यात घेतले. दुर्गेश अग्रवाल हा फरार झाला.

# आयएसओ जि.प. शाळा मल्हाराच्या विद्यार्थ्यांना फ्लोवर बॉल नॅशनल स्पर्धेमध्ये पुरस्कार



आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** आयएसओ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा मल्हाराचे तीन विद्यार्थी अभिनय निलेश तायडे, अर्पित निरंजन निर्मळे, क्रिष्णा रणजित जामूनकर यांना चेन्नई मद्रास येथे पार पडलेल्या नॅशनल फ्लोवर बॉल 14 वर्ष आतील स्पर्धेमध्ये ऑल इंडिया मधून गोल्ड मेडल मिळाले, त्यांना अनुक्रमे प्रथम आणि तृतीय मेरीट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विद्यार्थी आपले यशाचे श्रेय उच्चं श्रेणी मूख्याध्यापक कु शीला सोळंके, वर्ग शिक्षक तथा फ्लोवर बॉल क्रीडा मार्गदर्शक आदर्श शिक्षक बबलू कराळे, कल्पना चौधरी, केंद्र प्रमुख आदर्श शिक्षक श्रीकृष्ण उघडे, बबिता पंडित, रुपलाल बेठे, किरण साकरकर, रश्मी पानझाडे तसेच आई वडील यांना देतात.गावचे प्रथम नागरिक सरपंच नारायणजी बोरेकार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उत्तमराव शेळके, दीपकराव तायडे (उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती) सर्व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती, ग्राम विकास अधिकारी आमझरे साहेब यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व शिक्षक यांना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थी यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

# सुलतानपूरचे व्यापारी कारभारी चव्हाण यांचा असाही प्रामाणिकपणा

## पैशाने भरलेले पाकीट केले परत

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलतानपुर जवळील भांडेगाव फाट्यावर सापडलेले पैशाचे पाकीट भुसार मालाचे व्यापारी कारभारी चव्हाण यांनी प्रामाणिकपणा दाखवुन वापस केले आहे. घृष्णेश्वर साखर कारखान्यात मजुरी काम करणारा विरमगावातील युवक विजय काकासाहेब आधाने याचे रविवारी (ता. १४) सकाळी ट्रॅक्टरवर बसून जात असताना पैशांचे पाकिट पडले, विरमगावला घरी गेल्या नंतर पाकीट हरवल्याचे विजयच्या लक्षात आले, त्याने संपुर्ण रस्त्यावर शोध घेतला पण पाकीट सापडले नाही त्यामुळे विजय हताश होवुन बसला होता. विजय कारखान्यात मजुरी काम करतो तर वडील काकासाहेब आधणे शेत मजुरी करून कुंटूबाचा उदरनिर्वाह करतात. मुलाचे पैसे हरवल्याचे दुःख वडिलांनाही झाले होते. शेवटी कष्ट करून जमा केलेले पैसे हरवले तर त्याचे खूप मोठे दुःख मजुरी काम करणाऱ्याला होते, पण तेच पैशे



सापडल्याची बातमी त्यांना कळल्यावर दुखः पेक्षा जास्त आनंदही होतो याचा प्रत्यक्षात प्रत्यय आज पाहायला मिळाला. तुमच्या पैशांचे पाकीट हरवले आहे का ? ते सापडले आहे असा फोन विजयला आल्यावर विजयचा आनंद गगनात मावेनासा झाला. भांडेगावातील भुसार मालाचे व्यापारी कारभारी चव्हाण यांना दुपारी भांडेगाव फाट्यावर रोड वर एक पाकीट सापडले. त्यात कॅश साडे पाच हजार रुपये व आधार कार्ड आणि इतर महत्वाची कागदपत्रे होती.
कारभारी शेठ यांनी पाकिट सापडल्याची पत्रकार बाळू चव्हाण यांना दिली. पत्रकार चव्हाण यांनी विरमगावातील सरपंच संदीप आधाने व अशोक अधाने यांच्याशी संपर्क करून तुमच्या गावातील विजयचे पैसे सापडल्याची माहिती दिली. अशोक आधाने यांनी विजय व त्याच्या वडिलांना सोबत घेवून कारभारी चव्हाण यांची भेट घेतलीण. यावेळी कारभारी चव्हाण यांनी खात्री करून रोख साडेपाच हजार रुपये व कागद पत्रे विजयकडे सुपूर्द केले. या प्रसंगी मुक्तेश्वर गोरे, जितु जसोरिया, अनिल वेताळ, केदार कोकणे, अर्जुन चव्हाण, बंडू अधणे यांची उपस्थिती होती.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर